रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २३८
www.ramprahar.com
रामप्रहर
◆ मंगळवार, १७ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

राज्यसभा निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये पडली फूट

पाटणा : राज्यसभा निवडणुकीत बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या महाआघाडीला जबरदस्त धक्का बसला आहे. येथील राज्यसभेच्या पाचपैकी पाचही जागांवर केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)ने बाजी मारली आहे. या निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाला महाआघाडीमधील घटकपक्षांच्या चार आमदारांनी दांडी मारल्याने विरोधी पक्षांच्या उमेदवाराचे गणित बिघडले आणि एनडीएच्या पाचव्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. बिहारमध्ये राज्यसभेच्या पाच जागांसाठी निवडणूक झाली. यात एनडीएचे नितीश कुमार, नितीन नवीन, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाहा या चार उमेदवारांसह शिवेश राम हे पाचवे उमेदवारही विजयी झाले, तर महाआघाडीचे अमरेंद्र सिंह धारी पराभूत झाले. यामुळे महाआघाडीला झटका बसला आहे.

अंतरंग

नवी मुंबई मेट्रो-२ला मिळाली मंजुरी/२
तळोजात सेक्स रॅकेटचा पर्दाफाश! आरोपीला अटक/६
आमदार चषक महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचा थरार/८

पनवेल-उरण पाणीप्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली होणार बैठक

आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा

मुंबई : रामप्रहर वृत्त

सिडकोमार्फत पनवेल व उरण परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या सूचनेनुसार स्टेमसारखी स्वतंत्र प्राधिकरण (ऑथॉरिटी) कार्यान्वित करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत ही माहिती दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत पाणीपुरवठा प्रश्नासंदर्भात सिडकोकडून नागरिकांची होणारी फसवणूक अधोरेखित करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले. या प्रश्नावर उपमुख्यमंत्री महोदयांकडून निवेदनात उत्तर सकारात्मक नसल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उत्तरावर आक्षेप नोंदवला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात पाणी प्रश्नावर सडेतोड भूमिका मांडली. उत्तराच्या अनुषंगाने सिडकोने जर उत्तराची ब्रिफिंग दिली असेल, तर त्या माध्यमातून सिडकोने शासनाची दिशाभूल केली असल्याचे सांगितले. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, सहव्यवस्थापकीय संचालकांकडे सातत्याने जाऊन लोकांच्या पाणी प्रश्नाबाबत आवाज उठवतो. पाणी मिळावे यासाठी लोकांना मोर्चे, आंदोलन करावी लागतात. सिडकोच्या गेटला टाळे ठोकावे लागते, मात्र सिडको प्रशासनावर त्याचा कुठलाही परिणाम होत नाही. उत्तरात २०५०पर्यंतच्या १२७५ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतक्या पाण्याच्या व्यवस्थापनाचा रोडमॅप बनवला असे सांगितले जाते आणि तिथेच नमूद केले आहे की, २३ एमएलडी पाण्याची तूट आहे. सप्टेंबर २०२१पासून १० दशलक्ष, २०२२पासून ३० दशलक्ष वाढ केली असे सांगितले जाते. जर ४० दशलक्ष वाढ केली तर २३ दशलक्ष पाण्याची तूट कशी आली याचा अर्थ असा आहे की, या उत्तराच्या माध्यमातून शासनाची फसवणूक सिडकोच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

जवळपास सात ते आठ सोसायट्या आहेत. टँकरने पाणीपुरवठा ही आपत्कालीन व्यवस्था असली पाहिजे. मग त्या ठिकाणी दरवर्षी सोसायट्यांना ५० लाख, एक कोटी रुपयांचे पाणी विकत घ्यावे लागते. हे पाणी सिडकोने द्यायला पाहिजे. त्यामुळे याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करून सिडकोच्या अनागोंदी कारभाराचे वाभाडेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. दररोज पाणी

लागते ते संध्याकाळी देऊन भागणार नाही. हेटवणे योजना दुरुस्तीचे काम सुरू आहे. एमजेपी काम चालू आहे. नवी मुंबई महापालिका मनात येईल तेव्हा पाणी बंद करून टाकते अशा अनेक तक्रारी असूनसुद्धा सिडको याकडे अक्षरशः दुर्लक्षच करीत असल्याचे त्यांनी आपल्या लक्षवेधीतून अधोरेखित केले.

पनवेल, उरणला योग्य प्रकारे पाणीपुरवठा होण्यासाठी तातडीने उपाययोजना होणे गरजेचे नमूद करतानाच २०३०ला पाणी द्याल, पण लोकांनी आज कसे जगायचे असा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला तसेच अनेकवेळा पाणीपुरवठा नियमित व योग्य करण्यासाठी मागणी केली असल्याचे सभागृहाला सांगितले. त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी पनवेल व उरण तालुक्याचा पाणीपुरवठा स्टेम ऑथॉरिटीमार्फत करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली.

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले की, पाताळगंगा ७९ एमएलडी, हेटवणे १९२ एमएलडी, मोरबे ५९ एमएलडी व इतर असे एकूण ३४२ एमएलडी पाणीपुरवठा सिडकोच्या माध्यमातून केला जातो आता सन २०२६चे बघितले तर ३६५ एमएलडीची गरज आहे. खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तलोजा या भागात साधारण पाण्याची तूट दिसून येते. सिडकोने ज्या काही योजना केल्या त्यात तत्काळ पाणीपुरवठा, माध्यमिक योजना आणि लांब पल्ल्याच्या योजना अशा तीन प्रकारे सिडकोने नियोजन केले आहे. आता जी तत्काळ योजना आहे त्यामध्ये ३० एमएलडीची तूट आहे. मोरबे धरण एमजेपीला तयार करायला दिले होते त्यावेळी १०८ कोटी रुपये सिडकोने दिले होते. धरण झाल्यावर ते नवी मुंबई महापालिकेला हस्तांतर करण्यात आले. नवी मुंबईकडून आपल्याला फक्त ५९ एमएलडी पाणीपुरवठा होतो. त्यामुळे २००७पासून नवी मुंबई महापालिकेकडे मागणी केली की, १०८ कोटी रुपये शासनाकडे परत करावेत किंवा त्या पैशाच्या बदल्यात ९० एमएलडी पाण्याचा पुरवठा सिडकोला करावा. **(पान २ वर..)**

सिडकोच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सिडकोच्या कारभारावर तीव्र टीका करत नागरिकांची होत असलेली गैरसोय अधोरेखित केली. शासनाकडून मिळालेल्या उत्तरावर आक्षेप नोंदवत त्यांनी सिडकोने शासनाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. पनवेल व उरण परिसरात अनेक सोसायट्यांना दरवर्षी टँकरद्वारे लाखो रुपयांचे पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. २०५०पर्यंतच्या पाणी व्यवस्थापनाचा रोडमॅप सांगितला जात असताना सध्या २३ एमएलडी पाण्याची तूट असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत सिडकोच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सिडकोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार

या लक्षवेधी सूचनेवर बोलताना आमदार महेश बालदी यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या कारभारावर तीव्र टीका केली. सभागृहात त्यांनी सांगितले की, सिडको नैना, एज्यु-सिटी आणि तिसरी मुंबई उभारण्याचा प्रयत्न करत आहे, त्याचे स्वागत आहे, मात्र आजपर्यंत पाणी वितरणाच्या ऑटोमेशनसंदर्भात टीसीएसने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी सिडकोकडून का होत नाही? सिडकोमधील काही कर्मचारी टँकरमाफिया चालवतात, असा आरोपही त्यांनी केला. केवळ योजना जाहीर करून उपयोग नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अस्तित्वात नसलेले प्लॉट विकण्याच्या मागे लागले आहेत, असा गंभीर आरोप करत सिडकोमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराची कीड लागल्याचा घणाघाती आरोपही त्यांनी यावेळी केला.

धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे कोणत्याही धर्मावर अन्याय होणार नाही -मुख्यमंत्री

विरोधकांकडून मतांच्या लांगुलचालनासाठी विरोध

मुंबई : प्रतिनिधी

धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे कोणत्याही धर्मावर अन्याय होणार नसून केवळ मतांच्या लांगूलचालनासाठी विरोधकांकडून दिशाभूल केली जात आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १६) दिली. धर्मांतराच्या नावाखाली चालणाऱ्या कुप्रथांना आळा घालणे आणि महिलांची फसवणूक थांबवणे हाच या कायद्याचा मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी विविध मुद्द्यांवर सरकारची भूमिका मांडली. धर्मस्वातंत्र्य विधेयकाचे समर्थन करताना ते म्हणाले की, जर कुणी स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छित असेल, तर त्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया विधेयकात स्पष्ट केली आहे, मात्र आमिष दाखवून किंवा दपटशाहीने होणाऱ्या धर्मांतराला चाप बसणे आवश्यक आहे. अनेकदा तरुणींना फसवून पळवून नेणे, लग्नानंतर त्यांची प्रतारणा करणे आणि त्यांच्या मुलांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण होणे अशा घटना समोर आल्या आहेत. या प्रश्नांची उत्तरे या कायद्यात दडली आहेत.

महाराष्ट्र हे असे विधेयक आणणारे पहिले राज्य नाही.

यापूर्वी १०-१२ राज्यांनी असे कायदे केले आहेत. जिथे कधीही भाजपची सत्ता नव्हती, अशा तामिळनाडूनेही हे विधेयक स्वीकारले आहे. मग महाराष्ट्रातच राजकारण का? असा सवाल मुख्यमंत्र्यांनी यावेळी उपस्थित केला.

गॅस तुटवडा ही केवळ अफवा!

देशात घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. केंद्राने व्यावसायिक गॅसऐवजी घरगुती वापराला प्राधान्य दिले आहे तसेच साठेबाजी रोखण्यासाठीच दोन सिलिंडरमध्ये २३ दिवसांचे अंतर ठेवण्याचा नियम केला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले. असे असताना विरोधकांकडून लोकांमध्ये जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करून त्यांना रांगेत उभे केले जात असल्याचा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला.

पनवेल मनपा सभागृह नेतेपदी ॲड. प्रकाश बिनेदार

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिकेच्या सभागृह नेतेपदी भाजपचे अनुभवी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांची निवड झाली आहे. याबद्दल भाजप पदाधिकाऱ्यांनी आणि नगरसेवकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

निवडीवेळी महापौर नितीन पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेवक मनोज भुजबळ, गणेश कडू, दशरथ म्हात्रे, सुमित झुंझारराव, अजय बहिरा, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, रविनाथ पाटील, अमोल जाधव, कामगार नेते रवी नाईक, यतीन पाटील उपस्थित होते. सर्वांनी ॲड. बिनेदार यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

सभागृहातील अनुभवी, नियमांचा अभ्यास करणारे आणि जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून ॲड. प्रकाश बिनेदार यांची ओळख आहे. त्यांच्या सहकार्याने सभागृहात विकासाच्या मुद्द्यांना अधिक गती मिळेल, असा विश्वास महापौर नितीन पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

दरम्यान, नवनिर्वाचित सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपच्या नेतृत्वाचे निवडीबद्दल आभार मानले.

आव्हाडांच्या वक्तव्याने वाद

मुंबई : विधानसभेत धर्मस्वातंत्र्य विधेयकावर बोलताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासंदर्भातील दाखला देण्याचा प्रयत्न केला. त्यावरून सभागृहात वाद निर्माण झाला. अध्यक्षांच्या निर्देशानंतर आव्हाड यांनी माफी मागितली.

चाकणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात महिलेचा दुर्दैवी मृत्यू

चाकण : प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील औद्योगिक शहर असलेल्या चाकणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात एका ३२ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुणे-नाशिक महामार्गावरील आंबेठाण चौकाजवळ मध्यरात्रीच्या सुमारास दहा ते बारा भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने महिलेवर हल्ला चढवून तिचा जागीच जीव घेतला.

शोभा विजय वाघमारे (वय ३२) असे मृत महिलेचे नाव असून त्या मूळच्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील रहिवासी होत्या. सध्या त्या चाकण परिसरात वास्तव्यास होत्या. सोमवारी (दि. १६) मध्यरात्री सुमारे २च्या सुमारास त्या आंबेठाण चौकाजवळील उड्डाणपुलाखालून सर्व्हिस रोडने जात असताना अचानक भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने त्यांच्यावर हल्ला केला. जीव वाचवण्यासाठी त्यांनी दगड उचलून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र कुत्र्यांच्या आक्रमकतेपुढे त्यांचा निभाव लागला नाही. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

पनवेलमध्ये २२ मार्चला 'अवघ्या आशा श्रीरामार्पण'

रामनवमीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम

पनवेल : रामप्रहर वृत्त

श्री रामनवमीनिमित्त तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने अवघ्या आशा श्रीरामार्पण या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. २२) रात्री ८ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर होणार आहे.

भक्ती, संस्कृती आणि सुरेल संगीताचा संगम असलेल्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून गीत रामायणाच्या माध्यमातून रामतत्त्वाची कालसुसंगत मांडणी सादर केली जाईल. त्याचबरोबर प्रभावी कथन, भावपूर्ण गायन आणि दर्जेदार वाद्यसंगत यांचा आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. कार्यक्रमात स्नेहल दामले यांचे कथन, अभिजीत पंचभाई व श्रुती देवस्थळी यांचे गायन तसेच उद्धव कुंभार, अमित कुंटे आणि प्रसन्न बाम यांची वाद्यसंगत लाभणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून पनवेल व रायगड परिसरातील नागरिकांनी कुटुंबियांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय संध्येचा लाभ घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९), वैभव बुवा (९०२९४१०६९९), गणेश जगताप (९८७०११६९४४) किंवा आदित्य उपाध्ये (८२९११९७५२६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

एपीएमसीत आंब्यांची आवक

नवी मुंबई : प्रतिनिधी

नवी मुंबईतील एपीएमसी बाजारात कोकणातून येणाऱ्या आंब्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे. तब्बल सहा हजार पेट्या बाजारात दाखल झाल्याने आंबा खवय्यांसाठी ही एक पर्वणी ठरली आहे, मात्र आंब्याचे दर अजूनही वरचढ असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

मागील काही दिवसांपासून कोकणातून येणाऱ्या आंब्याची आवक वाढू लागली असून सोमवारी (दि. १६) नवी मुंबईतील एपीएमसी बाजारात तब्बल सहा हजार पेट्यांची आवक झाली आहे. चालू हंगामातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आवक असल्याचे सांगितले जात आहे.

नवी मुंबई मेट्रो-२ला अखेर मंजुरी

५,५७५ कोटींच्या प्रकल्पाला हिरवा कंदील ▌ तळोजा-खांदेश्वर ८.१५ किमी मार्गिका उभारणार कामोठे-कळंबोलीला जोडणी ▌ पुढे विमानतळापर्यंत विस्ताराचा प्रस्ताव विचाराधीन

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

अनेक वर्षांच्या विलंबानंतर अखेर राज्य सरकारने नवी मुंबईमधील दुसऱ्या मेट्रोला मंजूरी दिली आहे. सिडकोने १५ वर्षांपूर्वी या प्रकल्पाचा राज्य सरकारजवळ मांडला होता. यंदाच्या अर्थसंकल्पात यासाठी तब्बल ५,५७५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे नवी मुंबईतील अनेक ठिकाणांना जोडणी मिळणार असून पुढे नवी मुंबई विमानतळाशीही जोडण्याची योजना आहे.

मेट्रो १ आणि मेट्रो २ च्या जोडणीसाठी २.२ किमी विस्ताराची गरज असणार आहे ज्याला अद्याप मंजुरी मिळाली नाही आहे. दरम्यान, २ किमी स्पर मार्गिकेने

नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पण थेट जोडणीचा प्रस्ताव आहे.

विकासाला मिळणार चालना

ही ८.१५ किमी लांब मार्गिका तळोजा आणि खांदेश्वरदरम्यान उभारण्यात येणार आहे. या मार्गिकेमुळे कामोठे, कळंबोली आणि तळोजासारख्या शहरांना जोडणी मिळणार आहे. यामुळे पनवेल परिसरातील विकासालाही चालना मिळणार आहे. ही मेट्रो तयार झाल्यानंतर नवी मुंबई शहरात रेल्वे, मेट्रो आणि विमानतळ अशा प्रमुख पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. या मेट्रोचा प्रस्ताव पहिल्यांदा २०११मध्ये सिडकोने मांडला होता. त्यावेळी या मार्गाचा खर्च १,६०५ कोटी रुपये अपेक्षित होता. १५ वर्षात हा खर्च ५ हजार ५७५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.बातमी विश्लेषण

आठ स्थानके प्रस्थावित

तळोजा-खांदेश्वर मेट्रो मार्गिकेवर एकूण ८ स्थानकं प्रस्तावित आहेत. ही मार्गिका कामोठे, कळंबोली, तळोजा एमआयडीसी आणि खांदेश्वर या भागांमधून जाणार आहे. या मार्गावर खांदेश्वर, कामोठे सेक्टर १०, कळंबोली सेक्टर २, कळंबोली सेक्टर ७, कळंबोली सेक्टर १३, कडाडी, एमआयडीसी स्थानक १, एमआयडीसी स्थानक २ अशी आठ स्थानके प्रस्तावित आहेत. सध्या नवी मुंबईमध्ये बेलापूर ते पेंढार मेट्रो मार्गिका आहे. या मार्गिकेशी नवी मुंबई मेट्रो २ ला थेट जोडण्याचा देखील प्रस्ताव आहे.

'रेल्वे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करताना अधिकचा मोबदला मिळवून देणार'

कर्जत : प्रतिनिधी

बदलापूर-कर्जत रेल्वे मार्गावर नवीन मार्गिका टाकली जाणार आहे. या मार्गिकेसाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करताना जास्तीत जास्त मोबदला शेतकऱ्यांना दिला जावा. यासाठी आपण मध्य रेल्वे महाव्यवस्थापक यांची भेट घेऊन प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले.

कर्जत नेरळ भागातील शेतकऱ्यांनी खासदार बारणे यांना पत्र देऊन शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळवून द्यायचा प्रश्न मांडला आहे. मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांचा कर्जत, नेरळ भागात पाहणी दौरा केला जाणार असून त्यावेळी हा विषय देखील पुढे केला जाणार असल्याचे आश्वासन खासदार बारणे यांनी दिले.

बदलापूर - कर्जत मार्गावर दोन नवीन मार्गिका आणि फाटक असलेली ठिकाणी उड्डाणपुल बांधले जाणार आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करण्यासाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे. जमीन संपादित झाल्यामुळे हे शेतकरी भूमिहीन होणार असून त्यांच्या शाश्वत भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून रेल्वे मंत्री आणि संबंधित रेल्वे बोर्डाकडे ही मागणी लावून धरली जाईल असे आश्वासन दिले.

लवकरच मध्य रेल्वे महाव्यवस्थापक यांना नेरळ आणि कर्जत येथे सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यासाठी निमंत्रित केले आहे.

बालकांमध्ये संस्कार आणि मराठी भाषेचा अभिमान रूजवणे आवश्यक -वनमंत्री गणेश नाईक

नवी मुंबईतील पहिल्या बाल मराठी संमेलनाचे उद्घाटन

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

बालपणापासूनच मुलांमध्ये मराठी भाषा, संस्कृती आणि लोकशाही मूल्यांचे संस्कार रुजवणे आवश्यक असून अशा संमेलनांमुळे बालमनात साहित्य, कला आणि सामाजिक जाणीव विकसित होण्यास मोठी मदत होते, असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने आयोजित 'बाल मराठी संमेलन २०२६' या दोन दिवसीय संमेलनाचे उद्घाटन आज नवी मुंबईतील सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी (साने गुरुजी बालनगरी) येथे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजात पाटील, न.मु.म.पा. उपमहापौर दशरथ भगत, न.मु.म.पा. स्थायी समिती अध्यक्ष अशोक पाटील, विरोधी पक्ष नेते विजय चौघुले, आरोग्य समिती सभापती डॉ. नाथ, नगर सेविका शोभना गावडे, मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव डॉ. किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे, सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव, प्रसिध्द दिग्दर्शक, लेखक व अभिनेता महेश कोठारे, जेष्ठ साहित्यीक डॉ. सदानंद मोरे, जेष्ठ बालनट्यकर्मी प्रतिभा मतकरी, अखील भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, जेष्ठ नाटयकर्मी सुप्रिया विनोद, तसेच मराठी भाषा व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांसह मोठया संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थीनी उपस्थित होते.

यावेळी बोलताना गणेश नाईक यांनी संत परंपरेचा उल्लेख करत संत ज्ञानेश्वरांच्या 'हे विश्वची माझे घर' या विचाराचा संदर्भ दिला. धर्म, जात, पंथ, वर्ण आणि वर्ग यांमधील भेद दूर करून मानवतेचा संदेश देण्याचे काम संतांनी केले असून महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली भूमी असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी भाषेच्या गौरवाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. मराठी भाषिकांची ही अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याने मराठी भाषेच्या संवर्धनाला नवी दिशा मिळाली आहे.

बालसाहित्य संमेलनाच्या संकल्पनेचा उल्लेख करताना त्यांनी क्रिकेटमधील अंडर-१९ स्पर्धेचे उदाहरण देत सांगितले की, जसे क्रीडा क्षेत्रात लहान खेळाडूंना व्यासपीठ मिळते, तसेच साहित्य आणि संस्कृती क्षेत्रातही मुलांना संधी देणे आवश्यक आहे. बालपणापासूनच मुलांना लोकशाहीची प्रक्रिया, सामाजिक जबाबदारी आणि संस्कार यांची जाणीव करून देणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

नवी मुंबई हे सुजाण आणि सुसंस्कृत नागरिकांचे शहर असून येथे आयोजित करण्यात आलेले बाल मराठी संमेलन हे स्वागतार्ह पाऊल असल्याचेही त्यांनी नमूद केले. भविष्यात अशा उपक्रमांमुळे मराठी भाषा आणि संस्कृतीचा प्रवाह अधिक गतिमान आणि प्रकाशमान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे यांनी बाल मराठी संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी 'बोलका बाहुला'सारख्या पात्रांमधून मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले.

टेंभुर्ली येथील सह्याद्री विद्यालयात वाचनालयाची सुविधा

पनवेल : वार्ताहर

अंजनी माता शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच भिनार गावचे पोलीस पाटील हरेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून कै. विश्वनाथ तांबोळी यांच्या स्मरणार्थ कामोठ्याचा विघ्नहर्ता मंडळ वाचनालय सह्याद्री विद्यालय टेंभुर्ली (ठाणे) येथे मोफत वाचनालय सुरू करण्यात आले. ही संस्थेची सहावी शाखा आहे. १०० वाचनालय सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे.

टेंभुर्ली येथील शिक्षक, पालक आणि मांजरे पोलीस पाटील भरत चौधरी यांचा आग्रह होता की त्यांच्याकडे वाचनालय व्हावा. त्यासाठी त्यांनी संस्थेकडे पाठपुरावा केला. म्हणून संस्थेने त्यांच्याकडे वाचनालय सुरू केले. वाचनालयाचे उद्घाटन उद्योजक सचिन तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी सदर वाचनालय साठी मोठी आर्थिक मदत केली. संस्थेचे प्रास्ताविक सचिव जगदिश भोईर पोलीस पाटील साकुर्ली यांनी सादर केले. तर उपाध्यक्ष स्वागत विशे यांनी वाचनाचे महत्त्व काय आहे हे सांगितले.

ग्रामविकास अधिकारी दीपिका परटोले, किरण जाधव, योगेश बांगर, दिपक देशमुख, प्रमोद पोंढेकर यांनी सुद्धा आपल्या भाषणातून प्रबोधन केले. प्रमुख वक्ते नवनीत यशवंतराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी जयवंत आरज, शाहू भोसले, सुमित पानसांडे, अजय पाटील, संजय पुर, अक्षय सुळे, काशिनाथ चौधरी, हरिश्चंद्र विशे, भरत डोहले, वसंत चौधरी, सुरेश चौधरी, वैभव विशे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी संस्थेचे प्रसिद्धीप्रमुख संदीप आरज, सतीश कुलकर्णी, आदिनाथ देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक देशमुख सर व सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक पांडुरंग भेरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव जगदिश भोईर यांनी मानले.

जगप्रसिद्ध घारापुरी बेट येथे स्वच्छता अभियान

उरण : बातमीदार

मुंबईजवळील रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात अरबी समुद्रात वसलेले ऐतिहासिक घारापुरी बेट येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने समुद्रकिनारा स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. वनशक्ती , सागरशक्ती महाराष्ट्र वनविभाग कांदळवन कक्ष, दिवाले गाव ग्रामस्थ, गव्हाण कोळीवाडा ग्रामस्थ व शेवा कोळीवाडा तसेच स्थानिक मच्छीमार यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

या स्वच्छता मोहिमेत सुमारे ५० स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. मोहिमेदरम्यान बेटावरील किनाऱ्यालगत साचलेला सुमारे ३५०० ते ४००० किलो पर्यंत अविघटनशील कचरा गोळा करून योग्य पद्धतीने विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आला. समुद्रातून वाहत येणाऱ्या प्लास्टिक, थर्माकोल, काचेच्या बाटल्या आणि इतर कचऱ्यामुळे बेटाचे पर्यावरण आणि सौंदर्य धोक्यात येत असल्याने या स्वच्छता मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या उपक्रमात स्थानिक मच्छीमार देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समुद्रात साचणारा प्लास्टिक आणि घनकचरा यामुळे मच्छीमारांच्या जाळ्यात कचरा अडकतो, मासळीचे प्रमाण कमी होते तसेच बोटींच्या हालचालींनाही अडथळा निर्माण होतो. त्यामुळे समुद्रातील कचरा हा स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेवर थेट परिणाम करणारा गंभीर प्रश्न बनला आहे. स्वच्छता मोहिमेमुळे या समस्येबाबत जनजागृती होण्यास मदत झाली.

माणगाव : राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र. १४ मधील विविध शाळांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते सिद्धांत देसाई यांनी वह्या व खाऊ वाटप केले. यावेळी व्यापारी विक्रांत गांधी, तेजस गांधी, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, अमिन बागवान आदी उपस्थित होते.

अल्पवयीन मुलीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न

आरोपीस सहा वर्षे सक्तमजुरी

माणगाव, पोलादपूर : प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीवर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी आरोपीस ६ वर्षे ७ महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्याचा महत्वपूर्ण निर्णय माणगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांबाबत न्यायालयाचा कडक संदेश गेल्याचे मानले जात आहे.

सदर घटना पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सावंतकोंड (ता. पोलादपूर) येथे दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी घडली होती. या प्रकरणातील आरोपी शुभम गजानन वनारसे वय २१, रा. खडकवणे दत्तवाडी, ता. पोलादपूर याने पीडितेवर जीवघेणा हल्ला केल्याचे तपासात निष्पन्न झाले. घटनेनुसार, पीडित मुलगी आपल्या नातेवाईकांच्या गुरांच्या वाड्याजवळ असताना आरोपीने तिच्या तोंडात ओढणी कोंबून तिला जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकूने वार करून गंभीर दुखापत केली. त्यानंतर आरोपी मोटारसायकलवरून घटना स्थळा वरून पळून गेला. या घटनेप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सदर खटल्याची सुनावणी माणगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात झाली. सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता योगेश तेंडूलकर यांनी बाजू मांडली. या प्रकरणात फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी तसेच तपासी अधिकाऱ्यांच्या साक्षी न्यायालयासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या. सर्व पुरावे व साक्षीदारांचा विचार करून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. एस. टी. भालेराव यांनी ता. १६ मार्च रोजी आरोपी शुभम गजानन वनारसे यास दोषी ठरवून भा.दं.वि. कलम ३०७ तसेच पोक्सो कायदा कलम ९ व १० अंतर्गत ६ वर्षे ७ महिने सक्तमजुरी आणि ८ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

पान १ वरुन

पनवेल-उरण पाणीप्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली होणार बैठक

खरंतर नवी मुंबई महापालिका हा पुरवठा करू शकते, कारण या धरणातून ५१५ एमएलडी पाणी नवी मुंबईला मिळते. त्यांची गरज ४१५ एमएलडी आहे. त्या ठिकाणी १०० एमएलडी पाणी अतिरिक्त आहे. त्यामुळे नवी मुंबईने हा प्रस्ताव मान्य केल्यास ही तूट तत्काळ भरून निघू शकते.

मंत्री माधुरी मिसाळ पुढे म्हणाल्या, जेएनपीटी लाईनचे काम पूर्ण झाले तर १४ एमएलडी पाणी वळवू शकता येईल आणि हे दोन्ही तत्काळमध्ये उपाय आहेत. न्हावाशेवा टप्पा ३ योजनेचे काम साधारणत: डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल आणि तेथून सिडकोला ६९ एमएलडीचा पाणीपुरवठा उपलब्ध होईल.

स्टेमसारख्या ऑथॉरिटीची मागणी बरोबर आहे व ती आपण पूर्ण करू. त्यासाठी पॉलिसी डिसिजन घेण्याची गरज आहे. नवी मुंबई महापालिकेने सिडकोला पाणीपुरवठा करायला पाहिजे. सिडकोने तसे वारंवार तसे निर्देश दिले आहेत, पण नवी मुंबई महापालिका अद्याप पाणीपुरवठा करत नाही, तोही निर्णय घेण्याची गरज या निमिताने आहे. पनवेल महापालिकेला सिडको पाणीपुरवठा करते आणि ते काम महापालिकेला हस्तांतरित करू शकतो का याचाही विचार केला जाईल, असेही ना. मिसाळ यांनी स्पष्ट केले.

ऑटोमेशन सिस्टीम करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्यानुसार सिडकोतर्फे ९ सप्टेंबर २०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती, पण त्या निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर नवीन निविदा २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मागवली असून त्याचा कालावधी १८ मार्च २०२६पर्यंत आहे. त्याचबरोबर यासाठी फेब्रुवारी महिन्यात कन्सल्टंटची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार लवकरच ऑटोमेशन प्रणाली बसविण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली तसेच या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक आयोजित करण्याचे त्यांनी आश्वासित केले.

टेम्पोच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड तालुक्यातील तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावर चालत जाणारे पादचारी संतोष सुंदर पानवलकर (वय ५६, रा. तेलवडे, ता. मुरूड) यांना पाठीमागुन टेम्पोची धडक लागून त्याचा मृत्यू झाला.

सविस्तर असे आहे की, आयशर टेम्पोने तेलवडे गावातील चौधरी फर्निचर दुकानासमोरील रोडवर चालक राम कुमार शाम बिन्द वय ३७ वर्षं यांनी कोणताही क्लिनर खाली न ठेवता टेम्पो हयगयीने व अविचाराने मागे चालवत घेत असताना मागुन रोडवरुन चालत जाणारे पादचारी संतोष सुंदर पानवलकर यांना ठोकर लागुन ते जखमी झाले. रुग्णालयात त्यांना डॉक्टरांनी मयत घोषित केले.

दुखवटा

चंद्रशेखर सतविडकर

मुरुड : नगर परिषदेचे माजी शिक्षण सभापती व मुरुड तालुका भंडारी बोर्डिंगचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर सतविडकर यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा प्रज्वल व मुली जावई व नात असा परिवार आहे.

राजाराम आयकर

मुरुड : मजगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते राजाराम गंगाराम उर्फ राजभाई आयरकर यांचे शनिवारी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले ते ९९ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात चार विवाहित पुत्र व चार विवाहित कन्या नातवंडे असा मोठा परिवार आहे.सतत विस वर्षे मजगाव ग्रामपंचायतीचे सरपंचपद त्यांनी भुषविले होते.

निवडक

ज्येष्ठांची ऑनलाईन फसवणूक

पनवेल : खारघर परिसरात ऑनलाईन फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना सुमारे ३९ लाखांचा गंडा घालण्यात आला. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष तसेच सैन्यदलाचे नाव सांगून डिजिटल अटकेची भीती दाखवत ही फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. खारघर सेक्टर १८ येथील सिद्धी सोसायटीत राहणाऱ्या ७० वर्षीय सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाला सायबर भामट्यांनी २० लाख रुपयांचा गंडा घातला. तर खारघर सेक्टर ३४ मधील 'बोंझर रेसिडेन्सी' इमारतीत राहणाऱ्या ६८ वर्षीय महिलेची १९ लाखांची फसवणूक झाली. काही अनोळखी व्यक्तींनी सैन्यदलातील अधिकारी असल्याचे सांगून 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत लूट केली.

कुत्र्याच्या पिल्लाचा वाचवला जीव

पनवेल : सामाजिक कार्यकर्ते पवन सोनी यांच्या तत्परतेमुळे

एका कुत्र्याच्या छोटे पिल्याचा जीव बचावल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. टपाल नाका नगीना ज्वेलर्सच्या दुकानाच्या जाळीच्या आत एक कुत्र्याचे छोटे पिल्लू अडकले होते. याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांचे चिरंजीव पवन सोनी यांना त्या ज्वेलर्स मालकाने दिली त्यांनी तत्काळ त्यांचे सहकारी मंदार देसाई यांना सांगून त्या कुत्र्याला काढण्यास सांगितले. देसाई यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली व पनवेल अग्निशामक दल यंत्रणा बोलवून त्या कुत्र्याला सुखरूप काढून सोडले.

मनसे तालुका अध्यक्षपदी सोनवणे

पनवेल : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल तालुका अध्यक्षपदी सुजित सोनवणे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र त्यांना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या

हस्ते देण्यात आले. सुजित सोनवणे यांची मनसे, पनवेल तालुका अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांचे मित्र, हितचिंतक आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी सुजित सोनवणे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे आभार व्यक्त करत पनवेल तालुक्याचा विकास करण्यासाठी तसेच नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कुस्ती संकुलाची पाहणी

पनवेल : रामप्रहर वृत्त

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी पनवेल तालुक्यातील नितळस येथील छत्रपती संभाजी महाराज व लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलाची पाहणी केली. या भेटीदरम्यान कुस्ती संकुलातील सुविधा, मैदान व इतर आवश्यक सोयीसुविधांचा आढावा त्यांनी घेतला.

दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीदरम्यान या कुस्ती संकुलाच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून राजकारण करण्यात आले होते, पण या संकुलाचे काम पूर्णत्वाकडे जात असून लवकरच याचे भव्य उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

या माध्यमातून परिसरातील कुस्तीपटूंना उत्कृष्ट सरावाची सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार आहे.

या पाहणीवेळी तोंडरे येथील भाजपचे नेते महेशशेठ पाटील, पैलवान रूपेश पावशे, साजन पावशे, कैलास पावशे, बाळू काटे, सागर सागडे, बामाबुवा पावशे, गुरूनाथ पावशे, वासुदेव सागडे, निखिल पावशे, सोपान काटे, पैलवान क्षितिज म्हात्रे, पैलवान नवीन डोंगरे, पैलवान सुशील पावशे आदी उपस्थित होते.

रिकाम्या प्लॉटमध्ये लागली आग

पनवेल : वार्ताहर

पनवेल शहरातील बावन्न बंगला विभागातील सुशील गार्डनच्या मागील बाजूस असलेल्या रिकाम्या प्लॉटमध्ये अचानक आग लागल्याची घटना घडली. रात्रीच्या सुमारास लागलेल्या या आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले.

मिळालेल्या माहितीनुसार, सुशील गार्डनच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये अचानक आग लागली. परिसरातील नागरिकांनी धूर आणि ज्वाळा दिसताच तात्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आग आटोक्यात आणली. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित विभागाकडून या घटनेचा पुढील तपास करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

दरम्यान, आग लागल्यामुळे काही काळ परिसरात धुराचे लोट पसरले होते. अग्निशमन दलाने तत्परतेने कारवाई केल्यामुळे आग जवळील घरांपर्यंत पोहचण्यापूर्वीच नियंत्रणात आली आणि मोठा अनर्थ टळला.

भाजपच्या प्रभावी कार्यपद्धतीवर जनतेचा विश्वास –आमदार प्रशांत ठाकूर

सामाजिक कार्यकर्ते गुलशन पाटील यांचा समर्थकांसह पक्षप्रवेश

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष नेहमीच सर्वसामान्य आणि गोरगरिबांचा आवाज बुलंद करण्याचे काम करते तसेच त्यांच्यासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबवतो. याच कार्यपद्धतीमुळे जनतेचा भाजपवर मोठा विश्वास असून तो सार्थ ठरवणे आपले कर्तव्य असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी केले.

पनवेल तालुक्यातील वावंजे येथील सामाजिक कार्यकर्ते गुलशन पाटील यांनी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात हा कार्यक्रम झाला. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. सरकारच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचवणे आणि कोणत्याही नागरिकावर अन्याय होणार नाही याची काळजी घेणे ही भाजप कार्यकर्त्यांची जबाबदारी असल्याचे ते म्हणाले.

पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, नगरसेवक दिनेश खानावकर, किरण दाभणे, महेश पाटील, प्रकाश खैरे, दशरथ पाटील, वासुदेव चोरमेकर, वसंत पाटील, सागर सांगडे, भरत पाटील, महेश पाटील, शशिकांत गोंधळी, चंद्रकांत पाटील, विलास खैरे, अरुण थळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

गुलशन पाटील यांच्यासह कृष्णा पाटील, सतीश पाटील, रूपेश पाटील, नितीन भोईर, अनिल मुकादम, मयूर म्हात्रे, भानूदास वलपकर, सोमनाथ वलपकर, प्रवीण गोंधळी, प्रसाद सांगडे, प्रेम मुकादम, संजय सांगडे, करण पाटील, संदेश मढवी आदींनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले. आमदार प्रशांत ठाकूर व इतर मान्यवरांनी यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

मोहोपाडा, रसायनी परिसरात होणार श्री रामनामाचा गजर

मोहोपाडा : प्रतिनिधी

अखिल आर्यंवत संघ–आंतरराष्ट्रीय बजरंग दल व सकल हिंदू समाज आयोजित बजरंगी मित्र मंडळ रसायनी यांच्यावतीने मोहोपाडा रसायनीत गुरुवार, २६ मार्च रोजी श्रीराम नवमी उत्सवानिमित्त परिसरात श्रीराम नामाचा जयजयकार करीत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने शिवनगर येथील श्री गणेश मंदिरात श्री गणेशाची आरती करुन रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्याहस्ते श्रीरामाचे पुजन करून पालखीचा मान देवून शोभायात्रेला सुरुवात करण्यात येणार आहे. ही शोभायात्रा शिवनगर श्री गणेश मंदिरातून पुढे श्री हनुमान मंदिर, चांभार्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करत दांड–रसायनी रस्त्यावरून मोहोपाडा अशी काढण्यात येणार आहे.

आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे कोकण प्रांत अध्यक्ष प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे आणि रायगड जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे यांनी याबाबत माहिती दिली.

पनवेल : पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी जल जीवन मिशन अंतर्गत चिपळे ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली आणि कॉन्ट्रॅक्टरला लवकरात लवकर काम पूर्ण करण्यास सांगितले. सोबत भाजप विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी उपसरपंच मुकेश फडके आणि कॉन्ट्रॅक्टर उपस्थित होते.

चारचाकी वाहन प्रशिक्षण कार्यशाळा

पनवेल : रामप्रहर वृत्त

श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवीन पनवेल आणि चॅम्पियन मोटार ट्रेनिंग स्कूल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देणारे चारचाकी वाहन प्रशिक्षण शिबिर उत्साहात आणि यशस्वीरीत्या झाले.

समाजसमवेत शिबिर या उपक्रमांतर्गत महिला सबलीकरण हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून युसुफ मेहरअली सेंटर, मु. तारा, ता. पनवेल येथे या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला महिलांचा आणि विद्यार्थीनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराजजी विसपुते आणि संचालिका संगीताजी विसपुते यांच्या प्रेरणेतून तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या ॲड. डॉ. सीमा कांबळे मॅडम यांच्या कुशल नियोजनातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी चॅम्पियन मोटार ट्रेनिंग स्कूलचे सर्वेसर्वा राहुल रावल यांनी उपस्थित महिला व विद्यार्थीनींना मोटार वाहन चालविताना पाळावयाचे नियम, वाहतूक जनजागृती, वाहन चालविताना घ्यावयाची दक्षता तसेच सुरक्षिततेचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये १०० पेक्षा अधिक महिला व विद्यार्थीनींना प्रत्यक्ष चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, डॉ. नेहा म्हात्रे, डॉ. प्रितेश वाढे, प्रा. निलेश अडसुळे, प्रा. राजू गायकवाड, प्रा. सुषमा संकपाळ, संजय सुरावडे, महेश जाधव, प्रिया सागरे, शिवांजली पांढरपट्टे आणि दिपाली पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सुरक्षित वाहनचालना याबाबत जागरूकता निर्माण झाली, आणि समाजामध्ये महिला सक्षमीकरणाचा एक प्रेरणादायी संदेशही पोहचला.

संस्कार प्रतिष्ठानतर्फे प्रेरणादायी महिलांचा सन्मान

पनवेल : वार्ताहर

संस्कार प्रतिष्ठानतर्फे जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात स्वरसंसकार संगीत विद्यालयातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध गाण्यांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

या प्रसंगी समाजाला प्रेरणा देणाऱ्या तीन यशस्वी महिलांचा संस्कार प्रतिष्ठानतर्फे सत्कार करण्यात आला. यामध्ये सुप्रिया दळवी (यशस्वी उद्योजिका), स्मिता जोशी (अन्नपूर्णा) आणि सई पालवणकर (फिटनेस आयकॉन) यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाची संकल्पना व संपूर्ण आयोजन संस्कार प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांनी केले होते. कार्यक्रमास संस्थेच्या सदस्या ॲड. प्रीती भुजबळ व सुनंदा भुजबळ यांची उपस्थिती लाभली. संगीत, सन्मान आणि प्रेरणादायी वातावरणात महिला दिनाचा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

पाले येथे आज 'कोमसाप'चे काव्य संमेलन

उरण : वार्ताहर

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणच्या वतीने पाले येथील रामचंद्र म्हात्रे फार्महाऊसवर आज मंगळवारी (दि.१७) १२५ वे. मधुबन कट्टा महाकाव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाचे अध्यक्षस्थान साहित्यरत्न प्रा. एल बी पाटील भूषविणार आहेत, अशी माहिती कोमसापचे अध्यक्ष तथा निमंत्रक मच्छिंद्रनाथ म्हात्रे, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कार्याध्यक्षा रंजना केणी, समता ठाकूर, संजीव पाटील यांनी दिली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, साहित्य क्षेत्रातील नमिता कीर, प्रदीप ढवळ, विजू भाटकर, संजय गुंजाळ, गणेश कोळी, उज्वला दिघे, ज्योती राजपूत, संध्या दिवकर, गोपाळ शेळके, उज्वला दिघे, अक्षता गोसावी, संजना जवाटकर आदी साहित्यिक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या निमित्ताने विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वांचा विशेष सन्मान मूर्ती म्हणून सत्कार करण्यात येणार आहे. यात योगेश म्हात्रे, वसंत चिर्लेकर, सदाशिव पाटील, कीर्ती भगत, राजेंद्र पाटील, धीरेंद्र ठाकूर, चांगदेव पाटील, प्रशांत म्हात्रे, मयंक म्हात्रे, सत्यवान म्हात्रे, हितेश मढवी, प्रा. ए डी पाटील, अजय शिवकर, लवेंद्र मोकल, गुंजार पाटील, सचिन डाऊर, वैशाली भिडे, चंद्रकांत मुकादम, सूर्यकांत दोडेकर, नरेश मोकाशी, कृष्णा पाटील, संजय पाटील, राजेश चोगले, वरद गावंड, आर्यन मोरखडकर, संदेश राजगुरू या सर्वांचा समावेश आहे.

पनवेल मनपाच्या बचत गटांकडून दिल्लीतील अमृत महोत्सव कार्यक्रमात राज्याचे प्रतिनिधीत्व

पनवेल : रामप्रहर वृत्त

अमृत व डे–एन.यु.एल.एम. कृतीसंगम कार्यक्रमांतर्गत स्थापन बचतगटातील सदस्यांना उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाद्वारे अमृत मित्र हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून अमृत कार्यक्रमांतर्गत सहभागी बचतगटांचा गौरव करण्यासाठी केंद्र शासनाने १३ मार्च २०२६ रोजी भारत मंडपम, नवी दिल्ली येथे 'अमृत महोत्सव' आयोजित केला होता. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील निवड झालेल्या १४ महानगरपालिका, नगरपालिकांमधून पनवेल महानगरपालिकेतील श्री महालक्ष्मी महिला बचतगट, काळुंद्रे या बचतगटाला राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. यावेळी या बचतगटाला अमृत योजनेविषयी मनोगत व्यक्त करण्याचीही संधीही मिळाली.

अमृत मित्र उपक्रमांतर्गत स्वयंसहाय्यता बचतगटातील सदस्यांची अमृत मित्र म्हणून निवड करून त्यांना अमृत अभियानातील विविध प्रकल्पांशी निगडीत पाणी पुरवठा, मलनिस्सारण, हरित क्षेत्र विकास व वृक्षारोपण यांसारखी कामे देण्यात येत आहेत.

दिल्ली येथे झालेल्या अमृत महोत्सव कार्यक्रमात देशभरातील ३० राज्यांमधील महिला बचतगटांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्यातून एकूण १४ महानगरपालिका/नगरपालिका यांची निवड करण्यात आली होती. यामध्ये पनवेल महापालिकेला महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.

यासाठी डेएनयुएलएम विभागाचे उपायुक्त अभिषेक पराडकर व सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने यांचे मार्गदर्शन लाभले. डेएनयुएलएम विभागाच्या शहर अभियान व्यवस्थापक विनया म्हात्रे व कर्मचारी कोमल रोकडे यांच्या सहकार्याने या कार्यक्रमास श्री महालक्ष्मी महिला बचत गट, काळुंद्रे येथील महिला या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या.

सुट्टीच्या दिवशीही मालमत्ता कर भरण्याची पनवेल मनपातर्फे व्यवस्था

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून महापालिका क्षेत्रात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू असून चालू आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिल्यामुळे नागरिकांना कर भरणे सोयीचे व्हावे यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार ३१ मार्च २०२६ पर्यंत शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही महापालिकेची ११ कर संकलन केंद्रे सुरू ठेवण्यात येणार आहेत. मालमत्ता कर धारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या मार्च महिन्याच्या अखेरीस आर्थिक वर्ष संपत असून सुट्टीच्या दिवशी म्हणजे शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक

सुट्टीच्या दिवशीही(गुढीपाडवा , रामनवमी, रमजान ईद, महावीर जयंती) महापालिकेची कर भरण्याची सुविधा उपलब्ध असेल, तर कामकाजाच्या दिवशी कर संकलन केंद्रे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहतील. चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर भरण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असल्यामुळे नोकरदार वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही कर भरणे शक्य होणार आहे.

दरम्यान, उपायुक्त स्वरूप खारगे यांनी मालमत्ता कर विभागातील सर्व कर्मचारी तसेच मालमत्ता कर विभागातील वसुली पथके यांची बैठक घेऊन मालमत्ता कराचा भरणा वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना देऊन मार्गदर्शन केले.

ज्या मालमत्ता धारकांना अद्याप कराची देयके प्राप्त झाली नसतील त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर panvelmc.org किंवा KARMITRA PMC - APP वर नोंदणी करून ऑनलाईन पद्धतीने देयक प्राप्त करून कर भरणा करावा. ऑनलाईन पद्धतीने कर भरल्यास दोन टक्के सवलत देण्यात येणार आहे. मालमत्ता धारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

संपादकीय

कुणाचे अस्तित्व पणाला?

आसाम, केरळम, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या चार राज्यांमध्ये व पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. यासोबतच महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदारसंघांतील पोटनिवडणुकीचीही घोषणा झाली आहे. या दोन्ही मतदारसंघांतील पोटनिवडणुका बिनविरोध व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत. विधानसभा निवडणुकांपैकी पश्चिम बंगालकडे सर्वांचे विशेष लक्ष असेल कारण तेथील तृणमूल काँग्रेसची सत्ता उलथून टाकण्यासाठी भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरला आहे.

पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचे सरकार आणि निवडणूक आयोगामध्ये गेले अनेक दिवस धुमश्चक्री सुरू आहे. पश्चिम बंगालसह काही राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकांची घोषणा होऊ शकते हे ध्यानात घेऊन तृणमूल काँग्रेसने मुद्दाम आताच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्याविरोधात महाभियोगाचे हत्यारही उपसले आहे. महाभियोगाचा हा प्रस्ताव तडीस जाण्याची शक्यता नसून निव्वळ निवडणुकांच्या तोंडावर हा विषय चर्चेत आणण्याचा प्रयत्न तेवढा त्यामागे दिसतो. या पार्श्वभूमीवर आसाम, केरळम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल येथील विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांच्या मृत्यूमुळे रिक्त झालेल्या बारामती तसेच राहुरी या महाराष्ट्रातील विधानसभेच्या दोन मतदारसंघांतील पोटनिवडणूक २३ एप्रिलला होईल असेही जाहीर करण्यात आले आहे. मात्र, बारामतीतून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत. या दोन्ही मतदारसंघांतील पोटनिवडणुका बिनविरोध व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील असे सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम येथील विधानसभा निवडणुकांची चर्चा सुरू होती. यापैकी आसाममध्ये भाजपला विजयाची खात्री आहे तर पश्चिम बंगालमध्येही सत्ता हस्तगत करण्याचे भाजपचे मुख्य उद्दिष्ट आहे. यापूर्वीच्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपने तृणमूल काँग्रेसला तेथे तोडीची टक्कर दिली होती व आताही भाजपने तृणमूल काँग्रेससमोर तगडे आव्हान उभे केले आहे. गेली पंधरा वर्षे ममता बॅनजी त्या राज्यात मुख्यमंत्रीपदी असून त्यांच्या एककल्ली आणि आक्रस्ताळ्या कारभाराबद्दल जनतेत बराच असंतोष आहे. दक्षिणेतील राज्यांतही भाजपचा जनाधार किती वाढतो याकडे सगळ्यांचे लक्ष असेल. केरळममध्ये डावी आघाडी आणि काँग्रेसमध्ये चुरस असून काँग्रेस पक्षाकरिता तेथील निवडणूक सोपी नक्कीच नाही. तामिळनाडूत अद्यापही राष्ट्रीय पक्षांना पुरेसा जनाधार नाही. तिथे नेहमीप्रमाणे द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्यात लढत होणार असली तरी अभिनेता विजय थलपती यांच्या टीव्हीके या नव्या पक्षाने दोन्ही जुन्या पक्षांसमोर आव्हान उभे केले आहे. केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीमध्ये मुख्यमंत्री रंगास्वामी यांचा एनआर काँग्रेस पक्ष आणि भाजप यांच्या सत्ताधारी युतीशी काँग्रेस-द्रमुक आघाडीची लढत होईल. निवडणूक जाहीर झालेल्या राज्यांमध्ये निवडणूक आयोगाने मतदार याद्यांची स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) म्हणजेच विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रिया पूर्ण केली आहे. यापैकी पश्चिम बंगालमध्ये ही प्रक्रिया वादग्रस्त ठरली असून त्यावरून निवडणूक आयोग व तेथील तृणमूल काँग्रेस सरकारमध्ये वाद सुरु आहे. एसआयआर प्रकरण सर्वोच्च न्यायालयातही प्रलंबित आहे. एकंदर या विधानसभा निवडणुकांमध्ये काही प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व पणाला लागणार असून देशाच्या राजकारणाच्या दृष्टीनेही या निवडणुका महत्त्वाच्या ठरणार आहेत.

दर्जेदार आरोग्य सेवेसाठी पल्स वैद्यकीय परिषद

राज्यातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम आणि तंत्रज्ञानाधारित केल्या शिवाय राज्याचा सर्वांगीण विकास शक्य नाही. राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक आधुनिक,तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, परिषदेत वैद्यकीय शिक्षणक्षेत्रातील विद्यार्थी, डीन, विशेषतज्ज्ञ, खाजगी शैक्षणिक संस्था तसेच आधुनिक वैद्यकीय उपकरणे उत्पादक कंपन्या सहभागी होणार आहेत. याचा राज्याच्या मेडिकल टूरिझम आणि ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा दर्जासुधारणे यासाठी यापरिषदेचे सहकार्य लाभणार आहे.

'पल्स वैद्यकीय परिषद' २७ आणि २८ मार्च २०२६ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, बीकेसी येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या माध्यमातून आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती उद्योग,स्टार्टअप, तसेच वेलनेस पर्यटन या सर्व घटकांना एकाच व्यासपीठावर आणून

भविष्यासाठी स्पष्ट दिशा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ही परिषद केवळचर्चेपुरती मर्यादित न राहता ठोस निर्णय, गुंतवणूक करार, धोरणात्मक बदलआणि जनतेसाठी प्रत्यक्ष फायदे निर्माण करणारे व्यासपीठ ठरणार आहे.

राज्य आरोग्य क्षेत्रात अग्रगण्य असून देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक,उद्योगपती आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी होणार आहेत. त्यांच्या सहभागामुळे नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपचारपद्धती आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक राज्यात येण्यास मदत होईल. याचा थेट फायदा रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्यात, डॉक्टरांना नवीन संधी उपलब्ध होण्यात आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळण्यात होणारआहे.

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी हा यामागील उद्देश आहे. आयुष क्षेत्रात आयुर्वेद आणि लोपॅथी यांच्यात समन्वय साधून एकात्मिक आरोग्य व्यवस्था निर्माण करण्यावरही भर देण्यात येणार आहे. तसेच फार्मसी क्षेत्रातील नवीन संशोधन, डॉक्टरांचे संशोधन पेपर आणि नवकल्पना यांचे सादरीकरणही परिषदेत होणारआहे.

या उपक्रमाला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. परिषद उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आला. परिषदेत सुमारे २,९०० प्रतिनिधी सहभागी होणार असून त्यासाठी क्यूआर कोड आधारित प्रवेश, स्वतंत्र सत्र हॉल, हेल्पडेस्क,स्वयंसेवक आणि लाईव्ह स्क्रीनिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच सुरक्षा, वैद्यकीय आपत्कालीन सेवा, वाहतूक आणि निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र समन्वय कक्षही कार्यरत असेल.

परिषदेतील प्रमुख विषयांमध्ये डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता,वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा व कौशल्य विकास, संशोधन आणि नवकल्पना,मेडिकल व वेलनेस पर्यटन, गुंतवणूक तसेच ग्रामीण व सार्वजनिक आरोग्य बळकटीकरण या विषयांचा समावेश आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि

आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या विषयांवर व्यापक चर्चा केली जाणारआहे.

परिषदेत 'डिजी डोम' आणि 'टेक टॉक' या विशेष संकल्पनांचा समावेश करण्यातआला आहे. ३६० डिग्री डोममध्ये रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिॲलिटीद्वारे मेडिकल प्रशिक्षण, डिजिटल हॉस्पिटल व्यवस्थापन यांसारख्या तंत्रज्ञानाचे लाईव्ह आणि इमर्सिव्ह प्रेझेंटेशन सादर केले जाणार आहे.टेक टॉक सत्रांमध्ये देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक आणि उद्योगक्षेत्रातील नेते आपले अनुभव आणि नवीन कल्पना मांडतील. यामुळे तरुणडॉक्टर, विद्यार्थी आणि स्टार्टअप उद्योजकांना प्रेरणा आणि दिशा मिळेल.

या परिषदेच्या माध्यमातून राज्यासाठी स्पष्ट कृती आराखडा तयार करण्यातयेणार असून संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन भागीदारी करार,वैद्यकीय शिक्षणातील सुधारणा, गुंतवणूक आणि स्टार्टअप्ससाठी प्रकल्पघोषणा होण्याची अपेक्षा आहे. रोबोटिक सर्जरी, व्हर्च्युअल रिॲलिटीआधारित शिक्षण आणि तंत्रज्ञानाधारित उपचार प्रणाली यामुळे भविष्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल.

महाराष्ट्र वेलनेस पर्यटनाच्या क्षेत्रातही आघाडीवर आहे. सह्याद्रीपर्वतरांगा, समुद्रकिनारे, हिल स्टेशन, जंगल परिसर तसेच योग, आयुर्वेद,पंचकर्म आणि निसर्गोपचार केंद्र यामुळे राज्यात वेलनेस पर्यटनाला मोठीसंधी उपलब्ध आहे. उत्तम आरोग्य सुविधा आणि नैसर्गिक उपचार पद्धती यांचीसांगड घालून राज्याला जागतिक वेलनेस डेस्टिनेशन म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे पर्यटन वाढ, रोजगारनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

वेलनेस पर्यटनामुळे ग्रामीण भागातही रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.स्थानिक युवकांना योग प्रशिक्षक, थेरपिस्ट किंवा गाईड म्हणून प्रशिक्षणदेता येईल. महिला बचतगटांना हर्बल उत्पादने, स्थानिक आहार आणि होमस्टेसुविधा चालविण्याची संधी मिळेल. औषधी वनस्पतींची लागवड आणि हर्बल फार्मिंगमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यासही मदत होईल.

आंतरराष्ट्रीय रुग्णांना आकर्षित करण्यासाठी विशेष योजना राबविण्याचा विचारही शासन करत आहे. मेडिकल व्हिसा प्रक्रिया सुलभ करणे, प्रमुखशहरांमध्ये इंटरनॅशनल पेशंट हेल्पडेस्क स्थापन करणे, बहुभाषिक मार्गदर्शनउपलब्ध करून देणे, तसेच विमानतळ ते रुग्णालय समन्वय व्यवस्था उभारणे यांसारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

पल्स परिषदेत स्टार्टअप क्षेत्रासाठी विशेष व्यासपीठ उपलब्ध करून देण्यातयेणार आहे. तरुण उद्योजकांना त्यांच्या कल्पना गुंतवणूकदार, उद्योगपतीआणि धोरणकर्त्यांसमोर मांडण्याची संधी मिळेल. तसेच बल्क ड्रगपार्कसारख्या प्रकल्पांमुळे औषधनिर्मिती उद्योगाला चालना मिळून औषधांचा खर्च कमी करण्यास मदत होईल.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील आरोग्य सेवा मजबूत करणे हा या परिषदेचा महत्त्वाचा उद्देश आहे. टेलिमेडिसिन, डिजिटल हेल्थ रेकॉर्ड, मोबाईल हेल्थॲप्स आणि उच्चगती इंटरनेटच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांनातज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला उपलब्ध करून देण्याची व्यवस्था विकसित केली जातआहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांना तंत्रज्ञानाने सक्षम करून उपचार अधिकवेगवान आणि अचूक करण्याचा प्रयत्न आहे.

मानसिक आरोग्य क्षेत्रालाही परिषदेत विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.टेलि-मेंटल हेल्थ सेवा, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कार्यक्रम, २४तास हेल्पलाईन आणि डॉक्टरांसाठी विशेष प्रशिक्षण यांसारख्याउपक्रमांद्वारे मानसिक आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न केलाजाणार आहे.वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्यासाठी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधन प्रयोगशाळा मजबूत करणे, संशोधन अनुदाने उपलब्ध करून देणे आणि उद्योग-संशोधन संस्था-शासन यांच्यात सहकार्य वाढविणे अशीपावले उचलली जात आहेत. विद्यार्थ्यांना संशोधन पेपर सादरीकरण, पोस्टरप्रेझेंटेशन, इंटर्नशिप आणि करिअर नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य व्यवस्थेत महाराष्ट्राला देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात जागतिक दर्जाचे केंद्र निर्माण करणे, ग्रामीण आणि आदिवासी भागात मजबूत प्राथमिक आरोग्य सुविधा उभारणे तसेच मेडिकल आणि वेलनेस पर्यटनाच्या माध्यमातून राज्याला आंतरराष्ट्रीय आरोग्य गंतव्यस्थान म्हणून विकसित करणे हे शासनाचे दीर्घकालीन ध्येय आहे.

शब्दांकन : श्रद्धा मेश्राम, विभागीय संपर्क अधिकारी

बदलते तंत्रज्ञान

चक्क रोबोट्स करतात फूड डिलिव्हरी; व्हिडीओ व्हायरल

लहान मुलांच्या कार्टून्समध्ये अनेकदा आपल्याला घरातली सगळी कामं करणारा अत्यंत हुशार असा रोबोट म्हणजेच यंत्रमानव पाहायला मिळतो. तसेच रोबोट्स लवकरच प्रत्येकाच्या घरात असतील असे अंदाज काही वर्षांपूर्वी लोकांनी केले होते, जे आता खरेदेखील होत आहेत. तुम्ही स्वतःच्या घरात पाहिले तर अशी अनेक उपकरणे आहेत, जी तुमच्याशी संवाद साधतात, तुमच्या आज्ञांचे पालन करतात.

आपण याच तंत्रज्ञानाचा वापर करून फोनवरून अन्नपदार्थ ऑर्डर करत असतो, मात्र तुम्ही कधी फूड डिलिव्हरी करणारा रोबोट पाहिला आहे का? तुमची ऑर्डर तुमच्या दारापर्यंत पोहचवणारे रोबोट्स खरंच अस्तित्वात आहेत. असे रोबोट्स चीनमध्ये काम करीत असल्याचे सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओवरून समजते.

इन्स्टाग्रामवरून @ken_abroad नावाच्या अकाउंटने या भन्नाट रोबोटचा व्हिडीओ शेअर केला आहे. आता हा रोबो नेमके काम कसे करतो ते पाहू. या व्हिडीओमध्ये केनने व्हिडीओ शेअर करणारी व्यक्ती दाखवल्यानुसार फूड डिलिव्हरी करणारा रोबोट ऑर्डर घेऊन खोलीपाशी आल्यानंतर तो केनला फोन करतो. त्याबरोबर केन आपल्या खोलीचे दार उघडतो.

दारासमोर एक छोटा काळ्या-पांढऱ्या रंगाचा रोबोट उभा असल्याचे आपल्याला दिसते. त्या रोबोटच्या डोक्यावर एक लहानशी स्क्रीन दिसते. त्यावर 'ओपन' उघडा असा एक पर्याय असल्याचे केन सांगतो. त्यावर क्लिक केल्यानंतर, त्या रोबोटमध्ये बसवलेली काळ्या रंगाची काच उघडते आणि त्यामध्ये आपल्याला जेवणाचे पार्सल दिसते. केनने ते पार्सल घेतल्यानंतर तो रोबोट चायनीजमध्ये काहीतरी बोलतो, मात्र नेमके काय ते केनलादेखील कळत नाही, पण रोबोटला तिथून पाठवण्यासाठी पुन्हा त्या स्क्रीनवरील 'क्लोज' बंद करा या पर्यायावर क्लिक करतो. तेव्हा तुमचे पार्सल घेण्यासाठी ठराविक सेकंद असतात असेही केन सांगतो. क्लोज पर्यायावर क्लिक केल्यानंतर तो रोबोट पुन्हा चायनीजमध्ये काहीतरी बोलून निघून जातो, असे या व्हिडीओमध्ये आपल्याला दिसते.

भारतीय वंशाची अंतराळवीर कल्पना चावला

कल्पना चावला ह्या जन्माने भारतीय असलेल्या प्रथम महिला आणि राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात गेलेल्या दूसरया भारतीय व्यक्ति होत्या. त्यांचा जन्म १९६१ मध्ये हरियानामधील करनाल येथे झाला.कल्पना चावला यांच्या वडिलांचे नाव बनारसी लाल तर आईचे नाव संयोगिता चावला. त्यांच्या वडिलांचे औद्योगिक वस्तु निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई घर सांभाळायची. त्यांच्या आईला आपल्याला मुलगा व्हावा अशी इच्छा होती, पण त्यांना कुठे ठावूक होते कि आपली मुलगी संपूर्ण जगात नाव कमावेल! त्यांचे शिक्षण टागोर विद्यालय येथून झाले.

१९८२ साली त्या अमेरिकेत गेल्या. १९८४ साली त्यांनी टेक्सास विद्यापीठातून एरोस्पेस इंजीनिरिंग ची मास्टर ऑफ़ सायन्स ही पदवी मिळवली. त्यांना अन्तराळवीर होण्याच्या स्वप्नाने असे पछाडले होते त्यांनी १९८८मध्ये कोलेराडो मधून एरोस्पेस मध्ये डॉक्टरेट मिळवली. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओवरसेट मेथड्सच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तेथे त्यांनी कोम्प्यूटेशनल फ्लूइड डायनामिक्स मध्ये जागेवरच उभे उड्डाण, कमी अंतरात उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर

निमित्त

त्यांना ग्लाइडर्स, सीप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने यांच्या व्यवसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला.१९९१ मध्ये त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाल्यानंतर त्यांनी नासामध्ये ॲस्ट्रॉनॉट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना मार्च १९९५ साली तेथे प्रवेश मिळाला. त्यांनंतर त्यांची १९९६ मध्ये पहिल्या उड्डानासाठी निवड झाली. यानात शून्य गुरुत्त्वकर्षणाच्या अवस्थेत असताना त्या म्हणाल्या तुमचे अस्तित्व हे तुमच्या हुशारीमुळे असते. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमि प्रवास केला.त्यांची पाहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालु झाली. त्या ६ अंतराळविरांच्या चमुचा एक भाग होत्या.व हा चमु कोलंबिया स्पेस शटल एस.टी.एस ८७ चे चालन करत होता. त्यांच्या पहिल्या मोहिमेत त्या ३७२ तास अंतराळात होत्या. एस.टी. एस-८७ मोहिमेदरम्यान त्यांच्यावर नादुरुस्त असलेला स्पार्टन उपग्रह विंस्टन स्कॉट आणि तकाओं दोई यांच्याबरोबर स्पेसवॉक करुन तो दुरुस्त करने ही जबाबदारी होती. या मोहिमेनंतर त्यांना अंतराळ स्थानकावर काम करायचे होते. १६ जानेवारी २००३ रोजी चावला दुर्दैवी एस. टी. एस.१०७ मोहिमेवर जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला जवळजवळ ८० प्रयोग करावयाचे असून त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिति, अंतराळविरांचे आरोग्य आणि सुरक्षितता या विषयांचा समावेश होता.चावला यांचा मृत्यु १ फेब्रुवारी २००३ रोजी अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात पुनरप्रवेश आणि करताना जमिनीवर उतरताना अपघातात झाला. त्यांच्यासोबत असलेल्या सर्व चमूचा त्यात दुर्दैवी अंत झाला.त्यांना मरणोत्तर कांग्रेशनल स्पेस चे सन्मान पदक, नासा स्पेस फ्लाइट चे पदक तसेच नासा विशेष सेवा पदक बहाल करण्यात आले. (साभार : इंटरनेट)

चित्र रंगवा

आरोग्य प्रहर

जेवणानंतर गोड खाण्याची इच्छा का होते?

जेवणानंतर आपल्याला गोड पदार्थांची तीव्र इच्छा होते हे आपल्या खाण्याच्या वर्तनावर परिणाम करणाऱ्या जैविक, मानसिक आणि संवेदी घटकांमुळे होते.

जेवणानंतरही आपल्याला गोड पदार्थांची इच्छा होण्याचे एक मुख्य कारण म्हणजे सेंसरी- स्पेसिफिक सॅटीटी. ही संकल्पना विशिष्ट प्रकारच्या अन्नाचे मोठ्या प्रमाणात सेवन केल्याने मिळणारा आनंद कमी होण्याशी संबंधित आहे. उदाहरणार्थ- जर तुम्ही नुकतेच चविष्ट जेवण घेतले असेल, तर तुमचे चव रिसेप्टर्स त्या चवींबद्दल असंवेदनशील होतात; परंतु ते गोड चवींना अत्यंत तीव्र प्रतिसाद देतात. म्हणूनच पोट भरले असतानाही गोड पदार्थ खाण्याचा विचार आकर्षक राहतो.

जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याच्या आपल्या इच्छेत मेंदू महत्त्वाची भूमिका बजावतो विशेषतः साखर आणि फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने डोपामाइन बाहेर पडण्यास सुरुवात होते, जे आनंद आणि बक्षीस मिळाल्याचा भावनेशी संबंधित एक न्यूरोट्रान्समीटर आहे. डोपामाइनची ही वाढ आपले पोट तांत्रिकदृष्ट्या भरलेले असले तरीही अधिक गोड खाण्याची इच्छा वाढवते. मिष्टान्नांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने, ते मेंदूला एक बक्षीस मिळाल्याच्या भावनेचे तीव्र संकेत देतात, ज्यामुळे त्यांना प्रतिकार करणे कठीण होते. ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या पूर्वजांना उच्च कॅलरीयुक्त अन्न मर्यादित प्रमाणात उपलब्ध होते, म्हणून जेव्हा जेव्हा ते उपलब्ध असेल तेव्हा तेव्हा फळे आणि मध यांसारख्या ऊर्जासमृद्ध पदार्थांचे सेवन करणे जगण्यासाठी फायदेशीर होते. आपले शरीर आणि मेंदू अजूनही शक्य तितक्या वेळा कॅलरीयुक्त अन्न शोधण्यासाठी सज्ज असते, विशेषतः जेवणानंतर जेव्हा पचन सुरू असते तेव्हा.रक्तातील साखरेचे नियमन आणि हार्मोनल प्रभाव जेव्हा आपण कार्बोहायड्रेट्सयुक्त जेवण खातो तेव्हा आपल्या रक्तातील साखरेची पातळी वाढते, ज्यामुळे ग्लुकोजचे नियमन करण्यासाठी इन्सुलिन सोडले जाते. या प्रक्रियेनंतर रक्तातील साखरेचे प्रमाण जलद कमी झाल्यास पातळी पुन्हा स्थिर करण्यासाठी अधिक गोड खाण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. याव्यतिरिक्त घ्रेलिन आणि लेप्टिन यांसारखे हार्मोन्समध्ये जेवणानंतर चढ-उतार होतात, कधी कधी मिश्रित संकेत तयार होतात, ज्यामुळे आपल्याला जास्त अन्नाची आवश्यकता नसतानाही गोड खाण्याचीही इच्छा होते.

माणगावात अपूर्ण बायपासच्या कामामुळे पुन्हा महामार्गावर वाहतूक कोंडी

माणगाव: प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव व इंदापूर येथील बायपास मार्गांचे काम अद्याप अपूर्ण असल्याने या मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. शनिवार-रविवारच्या सुट्ट्या, लग्नसराई तसेच विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पर्यटक, प्रवासी आणि नागरिकांची या मार्गावर मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने वाहतूक कोंडीचा फटका सर्वांनाच बसत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम काही ठिकाणी रखडलेले आहे, तर काही भागात पुलांच्या कामालाही विलंब होत आहे. त्यातच माणगाव व इंदापूर येथील बायपास मार्गांचे काम पूर्ण न झाल्यामुळे बाजारपेठेतूनच वाहने मार्गक्रमण करत असल्याने येथे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत आहे. परिणामी, स्थानिक नागरिकांसह दूरवरून येणाऱ्या प्रवाशांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान,दि. १५ मार्च रविवारी दुपारी माणगावहून महाड बाजूकडे जाणाऱ्या मार्गावर सुमारे दोन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. या वाहतूक कोंडीमुळे पर्यटक, प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

या पार्श्वभूमीवर खासदार सुनील तटकरे यांनी नुकतेच माणगाव बायपासचे काम ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. बायपास मार्ग सुरू झाल्यानंतर मुंबईकर तसेच कोकणवासीयांना दीर्घकाळ भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी संबंधित ठेकेदाराकडून वेगाने काम सुरू असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांत माणगाव बायपास पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला होईल का, याकडे आता नागरिक आणि प्रवाशांचे लक्ष लागले आहे. बायपास मार्ग पूर्ण झाल्यानंतर या परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

खालापुरात भंगाराच्या दुकानाला आग
धुराचे लोट सहा किमी परिसरापर्यंत

खालापूर , खोपोली : प्रतिनिधी

मुंबई पुणे जुन्या महामार्गा लगत खालापुरातील पहिल्या हाळ जवळ सीएनजी पेट्रोल पंपाच्या मागच्या बाजूला असणाऱ्या प्लास्टिक भंगार गोदामाला अचानक आग लागली. या आगीत प्लास्टिक कागद, केमिकलचे ड्रम असा माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

केमिकलच्या ड्रमने मोठ मोठे स्फोट होत असल्याने परीसरात घबराटीचे वातावरण पसरले होते. तर धुराचे लोट खालापूर खोपोलीत पसरले होते.

घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले तर औद्योगिक वसाहतीतील अलाना टाटा स्टील व ५ आगीचे बंब दाखल झाले. अर्धा तासानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात मोहन मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यश आले.ही घटना दुपारी २. ३० वा सुमारास लागली आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.या भंगार दुकानाला आग लागण्याची पहिलीच वेळ नाही बऱ्याच वेळा या भंगार दुकानाला आग लागलेली आहे.

चौल गोळबादेवी येथील नूतन रस्ता उद्घाटन सोहळा

रेवदंडा : प्रतिनिधी

चौल गोळबादेवी येथील एमएमआरडीए माध्यमातून करण्यात आलेल्या नविन रस्त्याचा लोकार्पण सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ, जेष्ठ कार्यकर्ते प्रविण राउत, महेंद्र घरत, जयवंत घरत, अमोल भगत, प्रतिक गुरव, गुरव, काटकर तसेच गोळबादेवी ग्रामस्थ यांची उपस्थिती होती. यावेळी चौल मध्ये चौल शिवसेनेच्या मागणीने व आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नाने तसेच जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांच्या पाठपुराव्याने एमएमआरडीए माध्यमातून चौल मधील अनेक रस्ता नुतनीकरणासाठी १९ कोटी २७ लाख रूपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे. यावेळी गोळबादेवी मंदिर ते नाईक आळी, व ओमप्रकाश पाटील यांचे येथून ओंकार कंटक यांचे घर असे रस्ता नुतनीकरण करण्यात आला आहे. या नुतन रस्ताचे लोकार्पण कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

गोळबादेवी जेष्ठ ग्रामस्थांचे वतीने श्री फळ वाढविण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांचे हस्ते फित कापून नुतन रस्ताचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी चौलच्या सर्वांगिण विकासासाठी विशेषतः रस्ते व पाणी, लाईट यासाठी सर्वो तोपरी योगदान देण्याचे डॉ. सचिन राउळ यांनी मत व्यक्त केले.

पोलीस कार्यप्रणालीचा नामदेव सुर्वे लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतला अनुभव

पाली : प्रतिनिधी

विधी शाखेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासनाचे कामकाज, गुन्ह्यांचे स्वरूप आणि कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक असते. याच उद्देशाने माणगाव येथील नामदेव सुर्वे लॉ कॉलेजच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच माणगाव पोलीस ठाण्याला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

या अभ्यास दौऱ्याप्रसंगी नामदेव सुर्वे लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवींद्र राठोड प्रामुख्याने उपस्थित होते. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस ठाण्यातील दैनंदिन कामकाजाची सविस्तर माहिती दिली. गुन्हा घडल्यानंतर प्रथम माहिती अहवाल (FIR) कसा नोंदवला जातो आणि त्याचे कायदेशीर महत्त्व काय असते, याची माहिती दिली. गुन्ह्याचा तपास करताना पुरावे गोळा करणे, पंचनामा करणे आणि दोषारोपपत्र न्यायालयात सादर करेपर्यंतची प्रक्रिया त्यांनी समजावून सांगितली. आरोपीला ताब्यात घेतल्यावर त्याचे कायदेशीर हक्क आणि कोठडीतील नियमावली बाबत विद्यार्थ्यांना अवगत केले. सद्यस्थितीत वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण कसे करावे आणि कायद्याने त्याकडे कसे पाहावे, यावरही त्यांनी भाष्य केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्यातील विविध विभागाची व कार्यप्रणालीची माहिती घेतली.

स्वच्छतेच्या कार्याबद्दल नांदगाव सरपंच सेजल घुमकर यांचा सत्कार

मुरुड : प्रतिनिधी

गावातील स्वच्छतेच्या बाबतीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सेजलताई सुदेश घुमकर यांचा रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने अलिबाग येथे सत्कार करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत स्वच्छतेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांसमवेत 'कॉफी विथ विनर 'या कार्यक्रमात जिल्ह्यातील महिला सरपंच व सफाई कामगार यांचा बुधवारी जिल्हा परिषदेच्या सभागृहात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

न्हावे ग्रामपंचायतीचा महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम

धाटाव : प्रतिनिधी

रोहा तालुक्यातील न्हावे ग्रुप ग्रामपंचायतीमार्फत महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी १५ वा वित्त आयोग निधीतून कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटांसह परिसरातील सर्व महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात असून महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हे प्रशिक्षण दि. १४, १५ व १७ मार्च रोजी सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० या वेळेत केंद्रीय मराठी शाळा, न्हावे येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेत महिलांना दैनंदिन वापरातील विविध उत्पादने तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले जात आहे. यामध्ये केक व कुकीज तयार करणे, बॅगा तयार करणे, साबण बनविणे, फिनाईल तयार करणे तसेच मच्छीपासून लोणचे व पापड तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

उपक्रमाचे आयोजन जागृती स्वयंसहायता महिला मंडळाच्या माध्यमातून करण्यात आले असून अध्यक्ष हर्षा आब्रुंस्कर, सचिव प्रियंका पवार यांच्या पुढाकाराने कार्यक्रम पार पडत आहे. प्रशिक्षक दिप्ती गायकर या महिलांना विविध उत्पादनांची माहिती व प्रत्यक्ष मार्गदर्शन देत आहेत. शनिवार दि. १४ रोजी महिलांना कुकीज व केक तयार करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. सहभागी महिलांनी प्रत्यक्ष साहित्य वापरून विविध प्रकारचे केक व कुकीज तयार करण्याचा अनुभव घेतला. रविवार दि. १५ रोजी साबण व फिनेल तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले मंगळवार दि. १७ रोजी मच्छीपासून विविध पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रशिक्षणावेळी न्हावे सरपंच नितीन डबीर, उपसरपंच पांडूरंग कासकर, सदस्या संध्या पाटील, ग्रामसेवक दिपक वारगे, ग्रामसखी अश्विनी डबीर व असंख्य महिला उपस्थित होत्या. या उपक्रमामुळे महिलांना घरबसल्या व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळत असून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असल्याची भावना सरपंच नितीन डबीर यांनी व्यक्त केली.

रोहा : रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांचे अभिनंदन करताना ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष तथा रोहा पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, वाशी ग्रामपंचायत उपसरपंच अरविंद मगर, निडी तर्फे अष्टमी उपसरपंच उत्तम नाईक, पत्रकार महादेव सरसंबे आदी.

माथेरानमधील वेताळेश्वर मंदिराचा अभिषेक सोहळा

माथेरान : बातमीदार

माथेरानच्या अमन लॉज स्थानक परिसरातील निसर्गाच्या सान्निध्यातील वेताळेश्वर मंदिराचा अभिषेक सोहळा सोम. दि.१६ मार्च रोजी श्री पिसारनाथ आणि वेताळेश्वर अभिषेक समिती यांच्या वतीने झाला. यावेळी माथेरान मधील भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती.

सुप्रसिद्ध माथेरान पर्यटनस्थळ हे येथील वेगवेगळ्या पॉईंटमुळे पर्यटकांना नेहमीच भुरळ घालत असते. त्यातील अनेक स्थळे माहित नसतात त्यापैकीच हे एक स्थळ आहे वेताळेश्वर मंदिर.हा ब्रिटिशकाळापासून माथेरानकरांना परिचित असलेला दुर्गम भाग असून घनदाट जंगलात हे वेताळेश्वर मंदिर असून शंकराचे देवस्थान असल्याने माथेरानमधील भाविक आवर्जून दर्शनासाठी येथे जातात. अमन लॉज स्थानकापासून फक्त वीस मिनिटे दूर असलेले वेताळेश्वर हे भगवान शंकराचे स्थान आहे. पूर्वीच्या काळात येथे स्मशान होते.कालांतराने ही स्मशानभूमी बंद करून या ठिकाणी मंदिर उभारण्यात आले.

अलिबाग नगरपरिषद
ता. अलिबाग, जि. रायगड
निविदा सूचना सन २०२५-२६

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालयाची सेप्टिक टाकी उपसा करणेबाबत जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सुचना अलिबाग नगरपरिषद कार्यालयात दि. १७ /०३ /२०२६ पासून उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास प्रसिध्द करणेत येईल.

सही/-
दिनांक : १६/०३/२०२६ — मुख्याधिकारी
जा.क्र. ६७९ — अलिबाग नगरपरिषद

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr. No.	Tender/Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
01	**Tender No:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ E-Tender No. 01/2026-27 Dtd:- 17.03.2026 **RFx No. 7000039339**	**Sub:-** SRM E-Tender for providing Skilled / Unskilled Manpower on Outsourcing Basis at various Substation & EHV (O&M) Division Mahad for the year 2026-27	Rs. 1,41,06,961/- (Including GST)

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 5000/- + GST. Bid submission is from 17.03.2026 @ 00:00 hrs to 31.03.2026 @23:59 Hrs for above tender. For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in.**
Contact Person:- The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn. Mahad

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

Tender No. : E-Tender -02/2026-27 **Name of Tender :** E-Tender for providing three nos. of skilled labours & two nos. of unskilled labours against vacant post of LDC (F&A), UDC (F&A), Store Helper & Peon at Major Stores, Panvel for FY 2026-27. **Tender Fee :- Rs. 500/- + applicable GST** **RFx No. - 7000039323**	**Online Downloading the RFx :** Dt. 17.03.2026, 00:00 Hrs. to 31.03.2026, 23:59 Hrs. **Online Submission of the RFx :** On or Before Dt. 31.03.2026, 23:59 Hrs. **Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 01.04.2026 at 10:00 Hrs. (If possible). **Online Opening of the Price bid:** Dt. 01.04.2026 at 12:00 Hrs. (If possible)

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person :- The Executive Engineer, Mobile No. 8275215120
Note : All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
Executive Engineer
Major Stores, Panvel

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदरच्या नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल १) सौ. शर्मिला शैलेश घरत २) श्रीमती सविता काशिनाथ नाईक ३) श्री. शेखर काशिनाथ नाईक ४) सौ. निलम चंद्रकांत कोदे ५) सौ. उज्वला शरद पाटील ६) वनिता शिवराम नाईक ७) उर्मिला शिवराम नाईक उर्फ उर्मिला दिनेश पाटील ८) श्री.प्रशांत काशिनाथ नाईक यांनी श्री. देवांश परसराम पुरिया राहणार नरिमन पॉईंट, मुंबई यांच्याशी केलेला दि. ३०.१२.२०२४ रोजीचा साठेकरार आमचे अशिल सा नोटीसीद्वारे रद्दबादल करत आहेत. कारण या साठेकरारातील अटीनुसार ४५ दिवसांमध्ये श्री. देवांश परसराम पुरिया यांनी आमच्या अशिलांकडून घेतलेली खालील वर्णनाची जमिन व केलेला साठेकरार हा पुर्ण करायचा होता व त्यासंदर्भात आमच्या अशिलांनी श्री. देवांश परसराम पुरिया यांना वेगवेगळ्या वकिलांमार्फत नोटीसा देऊन साठेकरार मुदतीत पुर्ण करावा अन्यथा आमचे अशिल हा करार रद्द करत आहेत असे यापुर्वी देखिल कळविले होते. साठेकरारमध्ये वर्णन केलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

मौजे	भूमापन क्र. उपविभाग	क्षेत्र	आकार (रू.पैसे)
कावाडे, ता. अलिबाग	३०	०-४०-८० पो.ख. ०५-०५-२०	११.२२

साठेकरारात वर्णन केलेल्या वरिल मिळकतीच्या बाबतीत विक्रीची रक्कम रू.४,४०,०००,००/- (अक्षरी रूपये चार कोटी चाळीस लाख मात्र) एवढी ठरली होती व साठेकराराच्या वेळी आमच्या अशिलांना रू.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) देणेचे असे उभयतांमध्ये ठरले होते.

परंतू साठेकरार करून आज रोजी १३ महिन्याहून अधिक काळ उलटून गेल्यामुळे तसेच त्याबाबत श्री. देवांश परसराम पुरिया यांना अनेक वेळा कळवून देखिल त्यांनी हा साठेकरार पूर्णत्वास नेला नाही. त्यामुळे आमच्या अशिलांनी त्यांचे घेतलेले रू.१०,००,०००/- (अक्षरी रूपये दहा लाख मात्र) दिनांक १०.०३.२०२६ रोजी RTGS ने परत केलेले आहेत व त्याबाबतचा पुरावा आमच्या अशिलांकडे आहे. त्यामुळे आमचे अशिल कळवू इच्छितात की वरील मिळकतीच्या संदर्भात केलेला दि. ३०.१२.२०२४ रोजीचा अनोंदणीकृत साठेकरार आमचे अशिल आज रोजी रद्द करित आहेत व यापुढे हा करार आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही. तसेच वर उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने श्री. देवांश परसराम पुरिया यांच्याशी व्यवहार केल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत व भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही कायेदशिर परिणामासही जबाबदार असणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक : १६.०३.२०२६ — सही/-
ठिकाण : पनवेल — **ॲड. दिपक म. ठाकूर**
ॲडव्होकेट हायकोर्ट
पत्ता : शॉप नं. ९, पवन अपार्टमेंट, नवीन कोर्ट बिल्डींगजवळ, अशोक बाग, लोखंडी पाडा, पनवेल-४१०२०६. मो.नं. ९८१९८८१७०४

तळोजात सेक्स रॅकेटचा पर्दाफाश!

बांगलादेशी तरुणीचा वेश्याव्यवसायासाठी केला जात होता वापर

मुख्य आरोपीला पोलिसांनी केली अटक

पनवेल : वार्ताहर

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने तळोजा परिसरात टाकलेल्या धाडीत बांगलादेशी तरुणीचा वेश्या व्यवसायासाठी वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून अहमदाबादसह विविध शहरांमधील काही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पीडित तरुणीची सुटका करत तपास सुरू केला आहे.

तळोजा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनुसार, नवी मुंबईच्या गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी दिलेल्या माहितीनूसार, संबंधित ठिकाणी बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती सुरूवातीला मिळाल्यावर पोलिसांनी तळोजा येथील घोट गावालगतच्या कृष्णकुंज इमारतीमधील एका सदनिकेत तपासणी केली. या तपासणीत २५ वर्षीय नोयोन टोकिबोर शेख उर्फ आर्यन हा तरूण बांगलादेशी असल्याचे पोलिसांना आढळले. तसेच नोयोन याच्यासोबत अजून दोन तरूणी तेथे होत्या. या तरूणींच्या ओळखीसाठी त्यांची कागदपत्र आणि मोबाईल फोनची पडताळणी केली.

या पडताळणीत एक तरूणी ही मूळ बांगलादेशची असल्याचे उजेडात आले, मात्र या तरूणीकडे आधारकार्ड व इतर ओळखपत्र सापडल्याने या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर पोलिसही अवाक झाले. नोयोन याने या तरूणीला अहमदाबाद येथील अबावडी, बुधरापूर्व येथून आणल्याचे पोलिसांना सांगीतले, मात्र पिडिता बांगलादेशी नागरिक असल्याचे माहिती असूनही नोयोन याने तीला पोलिसांच्या स्वाधिन केले नाही. तसेच त्या पीडितेकडून गेल्या वर्षी जून महिन्यापासून ते १५ मार्चपर्यंत नोयोन याने पिडित बांगलादेशी तरुणीकडून वेश्या व्यवसायासाठी वापरल्याचे पुरावे पोलिसांना नोयोन याच्या मोबाईलमध्ये सापडले.

तसेच अहमदाबाद येथे राहणारी एक ३० वर्षीय महिला तिच्या पतीने या तरुणीकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेतल्याचे तपासात समोर आले आहे तसेच तिला वेश्या व्यवसायासाठी सातारा, नाशिक, जालना आणि रायगड अशा विविध जिल्ह्यात पाठवून तिच्याकडून मिळणारा मोबदला स्वतःच्या खात्यात घेत असल्याचेही पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. नवी मुंबईचे पोलीसांनी यापुढे तपास करून या पिडितेकडून सातारा, लोणावळा, वडखळ, जालना तसेच इतर काही ठिकाणी ज्या ग्राहकांकडे पाठवले त्यांचीसुद्धा चौकशी सुरू केल्यामुळे या पिडितेच्या असह्यतेचा फायदा उचलणाऱ्या अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

या प्रकरणात काही संशयित आरोपींची नावे व मोबाईल क्रमांक पोलिसांच्या हाती लागले असून त्यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३(२), ११५(२), ३५२, ३(५) तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्याच्या कलम ३, ४, ५ आणि ६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर खडके पुढील तपास करीत आहेत.

अनधिकृत फेरीवाल्यांवर घणसोलीमध्ये कारवाई

नवी मुंबई : बातमीदार

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात व रस्त्याच्या बाजुला वाहनांमध्ये खाद्यपदार्थाचा व्यवसाय करणाऱ्यांवर नवी मुंबई महानगरपालिका यांचे मार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

घणसोली विभाग कार्यालय अंतर्गत अनधिकृत फेरीवाला व रस्त्याच्या बाजुला वाहनांमध्ये खाद्यपदार्थाचा व्यवसाय करणाऱ्यांवर दिनांक ११ मार्च २०२६ रोजी जोरदार मोहीम घेण्यात आली. अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर घणसोली विभागा कार्यालया अंतर्गत घणसोलीगांव, आगरी कोळी चौक-सेक्टर-१५, घणसोली रेल्वे स्टेशन, घणसोली सेक्टर-५,आशापुरा चौक, सेक्टर-०३ व घणसोली सेक्टर-१ या ठिकाणी रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्या व अनधिकृत खाद्यपदार्थ धंदे करणारे व्यवसायिक वाहने यामध्ये शोरमा, वडापाव, अंडाभुर्जी, चाईनिज तसेच फेरीवाले यांचेवर घणसोली विभाग व वाशी विभाग यांचेमार्फत संयुक्त मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेमध्ये एकुण १२ हातगाड्या, ०१ आईस्क्रीम गाडी, ०१ फ्रुट टेम्पो, ६ टेबल, ११ सिलेंडर, ५ लोखंडी शेगडी, काऊंटर-०५, पाणी पुरी स्टॉल-०१ तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले असुन, वाहतुकीला कुठल्याही प्रकारचा अडथळा निर्माण होवु नये तसेच अनधिकृत फेरीवाल्यांवर प्रतिबंध बसावा याकरिता संयुक्त मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

घणसोली विभाग व वाशी विभाग कार्यालयातर्फे विभाग अधिकारी वसंत मुंडावरे यांच्या उपस्थितीत सदरची कारवाई करण्यात आली आहे. तसेच यापुढेदेखील सदरची मोहीम तीव्र करण्यात येणार आहे.

पनवेलमध्ये धर्मवीर बलिदान मास

पनवेल : रामप्रहर वृत्त

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या अद्वितीय बलिदानाची स्मृती जपण्यासाठी फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या (१८ फेब्रुवारी ते १८ मार्च) या कालावधीत होणारा धर्मवीर बलिदान मास पनवेल शहरात अत्यंत श्रद्धा व भावनेने पाळला जात आहे.

गेल्या दहा वर्षांपासून पनवेल परिसरात हा उपक्रम सातत्याने राबवला जात असून, यामध्ये मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी होत असतात. इतिहासातील अत्यंत क्रूर अत्याचार सहन करतही धर्म आणि स्वराज्यासाठी अढळ राहिलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून संपूर्ण महिनाभर श्रद्धांजली कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

फाल्गुन प्रतिपदेपासून अमावस्येपर्यंत दररोज सायंकाळी ७.३० वाजता पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ तसेच नवीन पनवेल, पळस्पे, डेरवली, चिखले, कामोठे, कळंबोली, नावडे, तळोजा आदी ठिकाणी सर्व हिंदू बांधव एकत्र येऊन संभाजी महाराजांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करतात.

धर्मवीर बलिदान मासाचे आचरण करताना अनेक शिवभक्त विशेष संकल्पही पाळत आहेत. संभाजी महाराजांनी शेवटच्या काळात अन्नपाण्याचा त्याग केला होता, याची आठवण ठेवत अनेक जण संपूर्ण महिनाभर दिवसातून एकदाच भोजन करणे, मिष्टान्नाचा त्याग करणे तसेच चहा, पान-तंबाखू यांसारख्या सवयींपैकी किमान एक गोष्ट सोडण्याचा संकल्प करतात. तसेच हा काळ शोक आणि स्मरणाचा मानून कोणतेही उत्सवी कार्यक्रम टाळले जातात.

दरम्यान, रविवारी झालेल्या श्रद्धांजली कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच नगरसेवक सुमित झुंझारराव उपस्थित राहून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी सर्व शिवशंभू भक्तांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ फूट उंच हिंदवी स्वराज्य ध्वजस्तंभ उभारावा तसेच पनवेलहून नवीन पनवेलकडे जाणाऱ्या पुलावरून खाली उतरताच असलेल्या सिग्नल चौकाला धर्मवीर छत्रपती श्री शंभूराजे चौक असे नामकरण करून पनवेल महानगरपालिकेच्या वतीने अधिकृत फलक लावावा, अशी मागणी करण्यात आली.

सखी कर्तृत्वाचा सन्मान सोहळा उत्साहात

पनवेल : रामप्रहर वृत्त

महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी तसेच त्यांना स्वयंरोजगार, उद्योग आणि प्रॉडक्ट मार्केटिंगच्या नव्या संधींबाबत मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने सखी कर्तृत्वाचा सन्मान हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि गार्गीज ग्रुप पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, भाजपा युवानेते प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालय, पनवेल येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रम भाजपच्या नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून पनवेल महापालिकेच्या उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील, ॲड. स्मिता पाटील, डॉ. सुप्रिया सहस्रबुद्धे आणि अर्चना परेश ठाकूर उपस्थित होत्या. तसेच मान्यवर पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष चारुशीला घरत, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य रतक्प्रभा घरत, नगरसेविका सरस्वती काथारा, दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, प्रियंका कांडपिळे, सारिका भगत, अरुणा दाभणे, वंदना बहिरा, रेणुका मोहकर, मंजुळा कातकरी तसेच अर्बन बँकेच्या संचालिका माधुरी गोसावी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. समाजाच्या पायाभूत स्तरावर निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या स्वच्छता कर्मचारी, हॉस्पिटलमधील आया, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच शाळांमधील आया या महिला कर्मचाऱ्यांचा सखी कर्तृत्वाचा सन्मान या माध्यमातून विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी परंपरागत बुरूड व्यवसाय जपणाऱ्या सुलोचना पांडुरंग खैरे आणि सुशीला अनंत खैरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील दिपा दिलीप पनवेलकर, श्रीमती स्मिता सदानंद साखरे, कमकुबेन भारवाड, ज्योतीबेन चावडा, सुरक्षा क्षेत्रातील वनिता मेघराज मांजरेकर व अनिता रामचंद्र माळी, सामाजिक कार्यासाठी शुभा चंदेरी, महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या शैला दीपक खाडे यांचाही गौरव करण्यात आला.

नवी मुंबई महापालिकेत स्वच्छतेविषयक कार्यशाळा

नवी मुंबई : बातमीदार

स्वच्छ भारत मिशन (नागरी) २.० अंतर्गत कचरामुक्त शहरांसाठी राष्ट्रीय क्षमता बांधणी आराखडा तयार करण्यात आलेला असून त्या अंतर्गत सर्व स्तरातील शासकीय संस्थांमध्ये अधिकारी, कर्मचारी यांची स्वच्छतेविषयी क्षमता बांधणी करण्यात येत आहे. त्यानुसार केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने देशभरात प्रशिक्षण देण्यासाठी २३ स्वच्छता नॉलेज पार्टनर्सची नेमणूक केलेली आहे. त्यांच्यामार्फत देशभरात ठिकठिकाणी प्रशिक्षण कार्यशाळा राबविण्यात येत आहेत.

अशीच कार्यशाळा स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांच्या निर्देशानुसार, स्वच्छ सर्वेक्षण २०२५- २६ अंतर्गत जागतिक महिला दिन सप्ताहातील विविध उपक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेली होती. ज्ञानकेंद्रामध्ये यशस्वी रितीने संपन्न झालेल्या या महिला सफाई कर्मचारी क्षमता बांधणी व कौशल्य विकास कार्यशाळेमध्ये २५० हून अधिक महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांसह संबंधित अधिकारी, तांत्रिक कर्मचारी सहभागी झाले होते.

हिमालयन इन्स्टिट्युट फॉर एन्व्हायरमेंट, इकोलॉजी अँड डेव्हलमेंट या स्वच्छता नॉलेज पार्टनर संस्थेच्या वतीने ऑरनेट टेक्नॉलॉजिसच्या सहयोगाने आयोजित या स्वच्छता विषयक क्षमता बांधणी कार्यशाळेत घनकचरा व्यवस्थापन विषयातील अनुभवी व्यक्तिमत्व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सेवानिवृत्त विशेष कार्य अधिकारी आनंद जगताप तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या प्रशिक्षक तिक्षला गायकवाड यांनी उपस्थितांना सादरीकरणासह मार्गदर्शन केले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे आणि अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेप्रसंगी उपायुक्त डॉ.अजय गडदे तसेच मुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांनी उपस्थित राहून या कार्यशाळेचे महत्व अधोरेखित केले.

डॉ. बबन जाधव यांची नियुक्ती

कळंबोली : बातमीदार

मुंबई विद्यापीठ यांच्याकडून प्रा. डॉ. बबन भिवसेन जाधव (शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली) यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४४(३)(घ) नुसार महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळावर नामनिर्देशन करण्यात आले आहे. या नियुक्तीबद्दल शैक्षणिक क्षेत्रात आनंद व समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पदव्युत्तर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरु असतात.

प्रा. जाधव हे चेतनाचे हजारीमल सोमानी कॉलेज बांद्रा व सोफीया कॉलेज मुंबईचे कुलगुरू नामनिर्देशित अकॅडमीक कौन्सिल सदस्य आहेत. तसेच मुंबई विद्यापीठाचे एनएसएसचे, सीकेटी कॉलेज नवीन पनवेल व सीएचएम कॉलेज उल्हासनगर येथील इतिहास विषयाचे कुलगुरू नामनिर्देशित अभ्यास मंडळ (बी.ओ.एस.) सदस्य आहेत.

महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाला विविध महत्त्वाचे अधिकार व जबाबदाऱ्या दिलेल्या असून त्यामध्ये संलग्न महाविद्यालयांमध्ये नवीन पदव्युत्तर केंद्र स्थापन करण्याबाबत शिफारस करणे, विद्यमान पदव्युत्तर केंद्रांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास प्रोत्साहन देणे, जिल्हा पातळीवर पदव्युत्तर शिक्षण केंद्रांच्या विकासासाठी सहकार्य निर्माण करणे, शिक्षणाच्या संमिश्र स्वरूपातील तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे तसेच अध्यापकांच्या क्षमता वृद्धीसाठी उपक्रम राबवून पदव्युत्तर शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे यांसारखी महत्त्वाची कामे समाविष्ट आहेत.

नवी मुंबईत भाजपकडून राहुल गांधींचा निषेध

नवी मुंबई : प्रतिनिधी

१२ मार्च २०२६ रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्पीय बजेट चालू असताना मकर प्रवेशद्वारच्या बाहेर काँग्रेस नेते खा. राहुल गांधी व अन्य विरोधी पक्षातील खासदारांनी चहा-बिस्कीट बरोबर 'चायपार्टी' आयोजित केली होती.

यावेळी भारतीयांसाठी अत्यंत खेदजनक आणि आक्षेपार्ह असून खासदार राहुल गांधी यांचा आज भाजप नवी मुंबई पक्षाच्या वतीने बेलापूर येथे तीव्र निषेध करीत तीव्र निदर्शने करण्यात आली.

भारताची संसद ही आपल्या देशाची सर्वोच्च लोकतंत्र संस्था आहे, त्याची प्रतिष्ठा व मर्यादा राखणे ही देशातील प्रत्येक लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. परंतु या घटनेच्या माध्यमातून संसद परिसरात एकप्रकारे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' बनविण्याचे काँग्रेस कडून प्रयत्न करण्यात आले. विशेष म्हणजे मकर प्रवेश द्वाराजव)ळ कुठलेही धरणे-प्रदर्शन करू नये असे लोकसभा अध्यक्षांचे स्पष्ट निर्देश असतांनाही खासदार राहुल गांधी आणि अन्य खासदारांनी प्रवेशद्वारासमोर बसून विरोध करण्याचे नाटक केले, जे संसदीय नियमांची आणि अध्यक्षांच्या आदेशांची अवहेलना करणारे असून याचा घटनेचा निषेध करत राहून गांधी यांचा नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र निषेध करीत तीव्र निदर्शने करण्यात आली.

देशात घरगुती गॅसची कथित टंचाई असल्याचा भ्रम सर्वत्र पसरविण्याचे कटकारस्थान काँग्रेसने पक्ष करीत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार देशाच्या प्रत्येक नागरिकाला ऊर्जा सुविधा पुरविण्याकरिता वचनबध्द होऊन सातत्याने काम करीत असून काँग्रेस पक्षाच्या कथित देशप्रेमाचा निषेध करीत असल्याचे डॉ. राजेश पाटील यांनी बोलताना सांगितले.

पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा किसान मोर्च्याच्या अध्यक्षपदी सागर सांगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी सागर सांगडे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, नगरसेवक दिनेश खानावकर, प्रकाश खैरे, महेश पाटील आदी उपस्थित होते.

लगोरी बालकादंबरीचे प्रकाशन

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

नवी मुंबईतील ज्येष्ठ कवी-लेखक गजानन परब यांच्या लगोरी या विज्ञान बालकादंबरीचे प्राचार्य अजित मगदुम यांच्या हस्ते प्रकाशन झाले. प्रकाशनाचा कार्यक्रम नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई यांच्या वतीने जेष्ठ नागरिक भवन, सेक्टर-१२, नेरूळ येथे साजरा झाला.

यावेळी जेष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश पाटील, देवीदास पोटे, नाटककार अनिल मुनघाटे, गझलकार आप्पा ठाकूर, साहित्यिका वृक्षाली मगदुम, कवी घनश्याम परकाले, विलास राजुरकर, नवरंगचे अध्यक्ष 'गज आनन म्हात्रे' ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष विकास साठे, अरविंद वाळवेकर उपस्थित होते.

समतानगरजवळ लाखो लिटर पाण्याची नासाडी

मोहोपाडा : प्रतिनिधी

शिमगा होताच उन्हाचे चटके जाणवत असताना सर्वत्र पाण्याची पातळी खालावल्याचे चित्र दिसत आहे. रसायनी पाताळगंगासह आसपासच्या परिसरातील ग्रामीण भागातील अनेक गावांना पाणीटंचाईची झळ जाणवू लागली आहे.

यातच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दांडहून बारवई पुलाकडे नवीन पाण्याची पाइपलाइन टाकून पाणीपुरवठा सुरू केला आहे. या लाईनचे काम झाल्यानंतर दोन दिवसही झाले नसताना समतानगर बारवई येथे नवीन लोखंडी लाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जात आहे.

याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असून अशीच पाण्याची नासाडी होत राहिली तर पाणी संकट अधिक गडद होण्याची दाट शक्यता आहे.

गणपती विसर्जन घाटाची दुरवस्था

बोर्ली पंचतनमध्ये प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नदीचे नाल्यात रूपांतर

नागरिक संतप्त

श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त

बोर्ली पंचतन येथील गणपती विसर्जन घाटाची अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय बनली असून ग्रामपंचायतीच्या सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे नदीचे अक्षरशः नाल्यात रूपांतर झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा, साचलेले घाण पाणी, दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून यामुळे स्थानिक नागरिकांना दररोज प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

गावातील अनेक नागरिकांनी सांगितले की, गणपती विसर्जनासारख्या धार्मिक परंपरेशी जोडलेल्या घाटाची अशी अवस्था होणे हे गावासाठी लाजिरवाणे आहे. विसर्जन घाट परिसरात पावसाळ्यानंतर तर परिस्थिती अधिकच बिकट बनते. प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, कचऱ्याचे ढीग आणि साचलेल्या घाण पाण्यामुळे हा परिसर अक्षरशः कचऱ्याच्या डेपोमध्ये बदलल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार हा विषय अनेक वेळा ग्रामसभेत मांडण्यात आला, अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र प्रत्येकवेळी केवळ आश्वासने देण्यात आली आणि प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत आणि संबंधित

प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गावातील लोकांनी या कचऱ्याच्या दुर्गंधीतून चालण्याची सवयच लावून घ्यायची का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक जण या मार्गाने रोज ये-जा करतात, मात्र परिसरात असलेल्या कचऱ्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे नाक दाबूनच या रस्त्यावरून जावे लागते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, गेली अनेक वर्षे विविध राजकीय सत्ताधाऱ्यांच्या काळात हा गणपती विसर्जन घाट कचरा आणि प्लास्टिकने भरलेला राहिला. अनेकांनी याबाबत लेखी तक्रारी केल्या, ग्रामसभेत आवाज उठवला, मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत काहीही बदल झाला नाही. त्यामुळे आता स्थानिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गणपती विसर्जन घाट हा केवळ धार्मिक स्थळ नसून गावाच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने भाविक येथे येतात, मात्र घाट परिसरातील घाण आणि कचरा पाहून भाविकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या मते, बोर्ली पंचतन गावातही स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित विसर्जन घाट असणे ही त्यांची मूलभूत अपेक्षा आहे. आता पाहायचे म्हणजे पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि स्थानिक ग्रामपंचायत या गंभीर प्रश्नाकडे कितपत लक्ष देतात आणि वर्षानुवर्षे कचऱ्याच्या विळख्यात अडकलेल्या या घाटाला खऱ्या अर्थाने स्वच्छतेचा श्वास कधी मिळतो, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

दरम्यान, बोर्ली पंचतन हे राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघात येत असल्याने स्थानिक नागरिकांकडून या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या प्रश्नावर उपाययोजना करून विसर्जन घाट स्वच्छ, सुरक्षित आणि प्लास्टिकमुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, इतकी वर्षे जर प्रशासनाने दुर्लक्ष केले असेल तर आता नवीन सत्ताधाऱ्यांनी तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे. या प्रश्नावर तातडीने कारवाई झाली नाही तर नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. गणपती विसर्जन घाट परिसराची तातडीने स्वच्छता करून प्लास्टिकमुक्त करणे, कचऱ्याची नियमित विल्हेवाट लावणे आणि परिसराचे सुशोभीकरण करणे या मागण्या आता जोर धरत आहेत.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पोलिसांची सतर्कता

आत्महत्येच्या प्रयत्नातून वाचवले तरुणाचे प्राण

खोपोली, खालापूर, चौक : प्रतिनिधी

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर एक तरुण आत्महत्या करण्याच्या उद्देशाने कारने निघाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करून त्याचे प्राण वाचवले. बोरघाट पोलीस पथकाच्या सतर्कतेमुळे ही घटना टळली असून पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक होत आहे.

शनिवारी (१५ मार्च) पहाटे सुमारे ३.०५ वाजण्याच्या सुमारास खोपोली पोलीस ठाण्याच्या डायल ११२ वर एक कॉल प्राप्त झाला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने आपल्या मित्राने क्रेटा कार (एमएच१२/वायए ४२२४) घेऊन इन्स्टाग्रामवर लाईव्ह व्हिडिओ करत आत्महत्या करण्यासाठी निघाल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच खोपोली पोलीस ठाण्याकडून बोरघाट येथील पोलिसांना सतर्क करण्यात आले.

यानंतर बोरघाट येथील डी. डी. पथकातील पोलीस शिपाई सचिन घोरपडे यांनी तात्काळ माहिती बोरघाट व्हॉट्सॲप ग्रुपवर प्रसारित केली. प्रभारी अधिकारी स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदर तरुण मुंबई-पुणे द्रुतगती

मार्गावरून जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली.

बोरघाट पोलीस मदत केंद्रातील अंमलदार पोलीस हवालदार अमोल कांबळे, पोलीस शिपाई संदीप आव्हाड आणि पोलीस शिपाई नाशिर शेख यांनी सतर्कतेने जवळपास दीड तास महामार्गावर लक्ष ठेवून शोध सुरू ठेवला. अखेर अमृतांजन ब्रिज परिसरात संबंधित वाहन अडवण्यात पोलिसांना यश आले. वाहन चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव संजय सुदाम दंडवते (वय २३, रा. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) असे सांगितले. डायल ११२ वरून मिळालेल्या माहितीनुसार तोच तरुण असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी त्याच्याशी आपुलकीने संवाद साधून त्याला शांत करून घातक इराद्यापासून त्याला परावृत केले.

प्रभारी अधिकारी स्वप्नील पाटील यांच्या आदेशानुसार बोरघाट पोलीस मदत केंद्राच्या शासकीय वाहनातून त्या तरुणाला खोपोली पोलीस ठाण्यात आणून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पुढे खोपोली पोलीस ठाण्याकडून प्रभारी अधिकारी सचिन हिरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित तरुणाला त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले असून याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

या घटनेत बोरघाट पोलीस पथकाने दाखवलेल्या सतर्कता आणि तत्परतेमुळे एका तरुणाचे प्राण वाचले असून प्रभारी अधिकारी स्वप्निल पाटील तसेच पोलीस कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलीस महानिरीक्षक संजय दराडेंचे मुरूड पोलीस ठाण्यात वार्षिक परीक्षण

मुरूड : प्रतिनिधी

कोकण परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी मुरुड पोलिस ठाण्याला भेट देत वार्षिक निरीक्षण व तपासणी केली आहे. या भेटीदरम्यान त्यांनी मुरूड पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत विविध विभागांची पाहणी केली. कोकण परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांचे स्वागत साहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश रसेडे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक डॉ. आँचल दलाल, जिल्हा पोलीस उपअधीक्षक अभिजित शिवथरे, अधीक्षक सुयशकुमार सिंग व मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे उपस्थित होते.

या निरीक्षण प्रक्रियेदरम्यान मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, साहाय्यक निरीक्षक राजेश रसेडे, उपनिरीक्षक शफिक शेख, उपनिरीक्षक बळीराम केंद्रे, महिला उपनिरीक्षक अर्चना मोगरे, मकरंद पाटील

यांच्यासह इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

यावेळी कोकण परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी पोलीस ठाण्यातील नोंदी, शस्त्रागार तसेच परिसराची पाहणी केली. कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी वार्षिक निरीक्षणाच्या निमित्ताने मुरूड पोलीस दलाच्या कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत कामकाजाचा संपूर्ण आढावासुध्दा घेतला.

घरफोडी गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल फिर्यादी यांना परत देताना कोकण परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक संजय दराडे दिसत आहेत. त्यांच्यासमवेत मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे हे दिसत आहेत.

लव्हेज भागात वन्यप्राणी, पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठा

खोपोली : प्रतिनिधी

परिसरातील वन्यजीवांना आणि पक्षांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी शिवतीर्थ श्रीरामनगर वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून कृत्रिम पाणवठा (तलाव) उभारण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम वनपाल भगवान दळवी व तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

परिसरात वन्यजीवांना पिण्यासाठी कोणताही पाणवठा उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रस्टच्या सदस्यांनी पुढाकार घेत वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन खात्याच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

ट्रस्टचे महिला, पुरुष तसेच बाल मावळ्यांनी अतोनात

मेहनत घेत अवघ्या दोन दिवसांत मोठ्या आकाराचा कृत्रिम तलाव तयार केला. या तलावात सुमारे १० ते १२ हजार लिटर पाणी साठवण्याची क्षमता असून त्यामुळे परिसरातील वन्यजीवांना, प्राणी आणि पक्षांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या पर्यावरण पूरक उपक्रमात परिसरातील जयेश मोरे, शैलेश फावडे आणि अंकुश फावडे यांनीही मोलाचे सहकार्य केले. मोहिमेत ट्रस्टचे उपाध्यक्ष विशाल रामदास वाळुंज, सेक्रेटरी आशिष रामचंद्र खोपकर, खजिनदार किरण बुधा पाटील तसेच सदस्य राजेश पाटील, विशाल चव्हाण, ज्ञानेश्वर जगताप, राकेश रामचंद्र मिरवणकर आणि प्रदीप देशमुख यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच महिला सदस्या सुवर्णा विशाल वाळुंज, नेहा ज्ञानेश्वर जगताप आणि ज्योती राकेश मिरवणकर यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला.

याशिवाय साईदीप रितेश घावटे, भावार्थ किरण पाटील, साई ज्ञानेश्वर जगताप आणि गोलू देशमुख या लहानग्या मुलांनीही या उपक्रमात मनापासून मेहनत घेतली. काही दिवसांपूर्वी याच परिसरात वनवा लागून मोठ्या प्रमाणावर वनसंपदेचे नुकसान झाले होते. अशा परिस्थितीत रणरणत्या उन्हात वन्यजीवांसाठी पाण्याची सोय करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे मत तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांनी व्यक्त केले. समाजातील असे सामाजिक कार्यकर्ते वन खात्यासोबत सक्रिय राहिले तर भविष्यात पर्यावरणाची हानी टाळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

श्रीवर्धन लोकन्यायालयात ७८९ प्रकरणे निकाली

श्रीवर्धन : प्रतिनिधी

श्रीवर्धन न्यायालयात शनिवारी न्यायाधीश समीर शेख यांच्या अध्यक्षतेखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले. या लोकन्यायालयामध्ये ७८९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेले १९५ पैकी ४३ व वादपूर्व १३४१ पैकी ७४६ प्रकरणे निकाली निघाली आहेत.

या लोकन्यायालयामध्ये १६५५१८४ रुपये रक्कमेची वसुली झालेली आहे. दखलपात्र गुन्हे ४१, धनादेश अनादरीत २ प्रकरणे निकाली निघाली आहेत. वादपूर्व प्रकरणात बँक रिकव्हरी १७ इतर ६०७ प्रकरणे निकाली निघाली

आहेत. लोकन्यायालयाच्या आयोजनात ज्येष्ठ विधीज्ञ राजेश वावेकर, शैलेश चांदोरकर, पूजा दुर्गावले आणि जयेश गुरव व इतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

लोकन्यायालया संदर्भात जनतेमध्ये जास्तीत जास्त जागृती व्हावी व अनेक वर्ष प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गे लावण्यासाठी लोकन्यायालय हा उत्तम पर्याय आहे.
-समीर शेख, न्यायाधीश, श्रीवर्धन

माणगाव शहर शिवसेनेतर्फे इफ्तार पार्टी उत्साहात

माणगाव : प्रतिनिधी

माणगाव शहर शिवसेना शिंदे गटातर्फे रविवार, १५ मार्च २०२६ रोजी ज्येष्ठ शिवसैनिक तथा राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार यांच्या मोर्बा रोड, सिद्धीनगर माणगाव येथील निवास्थानाजवळील प्रांगणात इफ्तार पार्टी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार म्हणाले की, सामाजिक एकोपा हाच इफ्तार पार्टीचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. या इफ्तार पार्टीला राज्याचे रोजगार हमी योजनमंत्री ना.भरत गोगावले यांनी दूरध्वनीवरून आयोजकांना व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या.

सध्या मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरू असून या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटे लवकर उठून रोजा (उपवास) धरतात. सायंकाळी मगरीबच्या बांगीबरोबर हा रोजा सोडला जातो त्यास इफ्तारी असे म्हणतात.या पवित्र रमजान महिन्यात माणगाव तालुक्यातील मुस्लिम बांधवाना इफ्तार पार्टीच्या निमित्ताने एकत्र आणण्याचे काम शिवसेना पक्षातर्फे ज्ञानदेव पवार व सहकारी यांनी केले.

इफ्तार पार्टी, तिळगुळ वाटप अशा कार्यक्रमांमुळे हिंदू-मुस्लिम समाजातील स्नेहभाव अधिक प्रमाणात वृद्धिंगत होऊन सामाजिक एकोपा जपला जावा हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे ज्ञानदेव पवार यांनी सांगितले.

ॲड.आर.के. मेंदाडकर यांच्याकडून देहदानाचा संकल्प

श्रीवर्धन : प्रतिनिधी

दानासारखे दुसरे पुण्य नाही, या विचाराला जीवनमूल्य मानत प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. रामचंद्र कानू (आर. के.) मेंदाडकर यांनी मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडावे या भावनेतून संपूर्ण देहदानाचा संकल्प केला आहे. त्यांचा देह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सायन रुग्णालयाला दान करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून, या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भक्तीची प्रतिपंढरी म्हणून ओळख असलेल्या दिघी कोळीवाडा या छोट्याशा गावात जन्मलेल्या मेंदाडकर यांचा

जीवनप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या या भूमिपुत्राने मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर शिक्षण पूर्ण केले. केवळ २२व्या वर्षी बँकेत उच्च पदावर नोकरी मिळवूनही त्यांनी शिक्षणाची ओढ कायम ठेवली. पुढे उच्च शिक्षण घेत एल.एल.एम. पदवी प्राप्त करून त्यांनी मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

सामाजिक बांधिलकी जपणारे मेंदाडकर कुटुंब वैद्यकीय क्षेत्रातही समाजसेवा करत आहे. त्यांच्या तिन्ही मुलांनी वैद्यकीय शिक्षण घेतले असून मुंबईच्या कुर्ला येथे मेंदाडकर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारले आहे. या रुग्णालयात गोरगरीब रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

याच परोपकारी वृत्तीमधून त्यांनी देहदानाचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या भावी डॉक्टरांना शरीररचनाशास्त्राच्या अभ्यासासाठी मृतदेहांची गरज भासते. ही सामाजिक गरज ओळखून त्यांनी मृत्यूनंतरही आपला देह वैद्यकीय शिक्षणासाठी उपयोगी पडावा, असा उदात्त विचार प्रत्यक्ष कृतीतून साकारला आहे.

ॲड. आर. के. मेंदाडकर यांच्या या निर्णयामुळे कोळी समाजासह वकिल मंडळी आणि विविध सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

मुरूड : समुद्रकिनारी लाटांमध्ये गारव्याचा आनंद घेताना पर्यटकांचे छायाचित्र टिपले आहे सुधीर नाझरे यांनी.

पाकविरुद्धची मालिका बांगलादेशने जिंकली

ढाका : वृत्तसंस्था

वर्ल्डकपनंतर लगेचच बांगलादेश दौऱ्यावर गेलेल्या पाकिस्तान संघाला वनडे मालिकेत धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले. बांगलादेशने तिसऱ्या वनडेत विजय मिळवत तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पहिल्याच षटकात साहिबजाहा फरहानला गमावले. पाठोपाठ माझ सादत बाद झाला. अनुभवी मोहम्मद रिझवानला तास्किनने तंबूत परतावले. १७/३ या स्थितीतून गाझी घोरी आणि अब्दुल समाद यांनी डाव सावरला. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. नाहिद राणाने घोरीला बाद करत ही जोडी फोडली. त्याने २९ धावा केल्या. पाठोपाठ अब्दुल समादही बाद झाला. मुस्ताफिझूर रहमानने त्याला वैयक्ति ३४ धावांवर बाद केले. सलमान अली अघाने साद मसूदला हाताशी घेत डाव सावरला. या जोडीने सहाव्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी केली.

मुस्ताफिझूरने सादला माघारी धाडत ही जोडी फोडली. सादने ३८ धावांची खेळी केली. अष्टपैलू आणि अनुभवी फहीम अशरफ नऊ धावा करुन तंबूत परतला.

एकीकडे विकेट पडत असताना नाहिदच्या गोलंदाजीवर षटकार खेचत सलमानने तिसरे वनडे शतक पूर्ण केले. धावगतीचे दडपण वाढत असल्यामुळे सलमानने मोठा फटका मारायचा प्रयत्न केला, मात्र हा प्रयत्न शंटोच्या हातात जाऊन विसावला. सलमानने ९८ चेंडूत नऊ चौकार आणि चार षटकारांसह १०६ धावांची वेगवान खेळी साकारली. सलमान परतल्यानंतर शाहीन शहा आफ्रिदीने सूत्रे हातात घेतली. ४९व्या आणि मुस्ताफिझूरच्या षटकात त्याने दोन षटकार वसूल केले. यामुळे पारडे पाकिस्तानच्या बाजूने झुकले.

सहा चेंडूत १४ धावा असे समीकरण असताना बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसन मिराझने फिरकीपटू रिषादच्या हाती चेंडू सोपवला. रिषादचा पहिला चेंडू निर्धाव पडला. दुसऱ्या चेंडूवर त्यानेच आफ्रिदीचा झेल सोडत जीवदान दिले. तिसऱ्या चेंडूवर आफ्रिदीने दोन धावा काढल्या. चौथ्या चेंडूवर पाकिस्तानला एकही धाव काढता आली नाही. पाचवा चेंडूही निर्धाव गेला. शेवटच्या चेंडूवर १२ धावा हव्या असताना आफ्रिदी यष्टीचीत झाला. त्याने ३७ धावांची खेळी केली. बांगलादेशकडून तास्किन अहमदने चार, मुस्ताफिझूर रहमानने तीन, तर नाहिदने दोन विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी पाकिस्तानने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. सैफ हसन आणि तांझिड हसन यांनी १०५ धावांची खणखणीत सलामी दिली. सैफने ३६, नझमुल होसेन शंटोने २७, तर लिट्टन दासने ४१ धावा केल्या. षटकारासह तांझिडने पहिल्यावहिल्या शतकाला गवसणी घातली. सहा चौकार आणि सात षटकारांसह तांझिडने १०७ धावांची खेळी केली. तौहिद हृदॉयने ४४ चेंडूत नाबाद ४८ धावांची खेळी केली. पाकिस्तानकडून हारिस रौफने तीन विकेट्स घेतल्या.

बीसीसीआयच्या पुरस्कारांचे शानदार वितरण

■ बिन्नी, द्रविड, मितालीसह इतर खेळाडूंचा सन्मान

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीय) वार्षिक पुरस्कार सोहळा रविवारी नवी दिल्लीत पार पडला. या खास सोहळ्यात क्रिकेटमधील योगदानाबद्दल दिग्गज क्रिकेटर्स आणि युवा खेळाडूंना सन्मानित करण्यात आले.

यंदाच्या सोहळ्यात १९८३चे वर्ल्ड चॅम्पियन संघाचे सदस्य आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष रॉजर बिन्नी, भारतीय संघाचे माजी क्रिकेटर आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्यासह महिला क्रिकेटमध्ये अधिराज्य गाजवणारी भारताची माजी कर्णधार मिताली या दिग्गजांना भारतीयांना उल्लेखनीय सेवेसाठी बीसीसीआयच्या सर्वोच्च कर्नल सी.के. नायडू जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारताचा सध्याचा कसोटी आणि वनडे कर्णधार शुबमन गिल याला २०२४-२५ हंगामासाठी सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू (पुरुष) हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर स्मृती मानधना हिला महिला क्रिकेटमधील कामगिरीबद्दल सलग पाचव्यांदा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हर्षित राणा याला पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वोत्तम पदार्पणाचा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महिला गटात श्री चरणी हिला या पुरस्कराने गौरवण्यात आले. हे दोन्ही खेळाडू आता भारतीय संघात नियमित झाले आहेत. दिप्ती शर्मा २०२४-२५

हंगामात भारतीय महिला संघासाठी सर्वाधिक विकेट्स घेण्याचा पुरस्कार जिंकला आहे तसेच आयुष म्हात्रे याने २०२४-२५ हंगामातील देशांतर्गत मर्यादित षटकांच्या स्पर्धांतील सर्वोत्तम अष्टपैलू म्हणून लाला अमरनाथ पुरस्कार पटकावला.

बीसीसीआय नमन पुरस्कारप्राप्त खेळाडू

जीवनगौरव पुरस्कार : रॉजर बिन्नी, राहुल द्रविड, मिताली राज; सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय खेळाडू शुबमन गिल, स्मृती मानधना; सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय पदार्पण हर्षित राणा, एन. श्री चरणी, एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक बळी दिप्ती शर्मा, देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वोत्तम संघ मुंबई क्रिकेट असोसिएशन, रणजी ट्रॉफी सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू हर्ष दुबे, लाला अमरनाथ पुरस्कार आयुष म्हात्रे, सर्वोत्तम पंच (घरगुती क्रिकेट) उल्हास गंधे. याशिवाय इतरही खेळाडूंना वेगवेगळ्या श्रेणीतील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

कामरान अकलमची पाकिस्तानी खेळाडूंसह अध्यक्ष नक्वींवर टीका

इस्लामाबाद : वृत्तसंस्था

पाकिस्तान संघाने टी-२० विश्वचषकातील नामुष्कीजनक कामगिरीची मालिका कायम ठेवली आहे. बांगलादेशविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिकाही संघाने गमावली आहे. खेळाडूंच्या सुमार कामगिरीवर पाकिस्तानचा माजी स्टार खेळाडू आणि माजी निवडकर्ता कामरान अकमल याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) प्रमुख मोहसीन नक्वी यांच्यासह संघावर हल्लाबोल केला आहे.

बांगलादेशविरुद्धची एकदिवसीय मालिका गमावल्यानंतर संतप्त झालेल्या कामरान अकमल एका चर्चेदरम्यान म्हणाला, सध्याची परिस्थिती अशी आहे की, आता नेदरलँड्सलाही वाटेल आपण पाकिस्तानविरुद्ध मालिका खेळावी, त्यांना हरवावे आणि कसोटी दर्जा मिळवावा. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात बांगलादेश सहज ३५० धावा करू शकला असता, पण त्यांनी २९० धावांपर्यंत मजल मारली. लिटन दास संथ खेळला, तरीही आपण हरलो.

अकमलने पीसीबी प्रमुख मोहसीन नक्वी यांच्यावरही कडाडून टीका केली. २०२५च्या आशिया चषक स्पर्धेनंतर विजेत्या भारताने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर नक्वींनी ती स्वतः कडेच ठेवून घेतल्याचा आरोप आहे. अकमलने, जर तुम्ही मैदानात संघांना हरवू शकत नसाल, तर आता काय आयसीसीच्या ट्रॉफी चोरून घरी आणणार का?, असा संतप्त सवालही केला आहे.

दरम्यान, पाकिस्तानचा फलंदाज सलमान आघा सहर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात धावबाद झाल्यानंतर मैदानात संताप व्यक्त केल्यामुळे आयसीसीने त्याला फटकारले असून त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंट जोडला आहे.

वसीम जाफर हार्दिक पांड्याचा आदर्श खेळाडू

मुंबई : प्रतिनिधी

बीसीसीआयच्या अवॉर्ड सोहळ्यात हर्षा भोगले यांनी निवडक खेळाडूंची मुलाखत घेतली, ज्यामध्ये हार्दिक पांड्याचादेखील समावेश होता. यादरम्यान आदर्श खेळाडू हे विचारण्यात आल्यावर त्याने वेगळेच नाव घेत लक्ष वेधले.

बीसीसीआय अवॉर्ड सोहळ्यात हार्दिक पांड्या, अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी व संजू सॅमसन यांची मुलाखत घेण्यात आली. यामध्ये सर्वांना त्यांचे क्रिकेटमधील आदर्श कोण आहे, हा प्रश्न विचारताच पांड्याने माजी खेळाडू वसीम जाफर यांचे नाव घेतले.

राज्यात क्रीडा विकासाकरिता मिशन लक्षवेध

अलिबाग : प्रतिनिधी

जागतिक व आशियाई क्रीडा स्पर्धांमधून जास्तीत जास्त पदके महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंना प्राप्त करता यावीत याकरिता राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणेमार्फत राज्यातील क्रीडा विकासाकरिता मिशन लक्षवेध हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने मुंबई विभाग अंतर्गत स्पोर्ट्स एक्सलेन्स सेंटरमध्ये क्रीडा प्रकारानुसार प्रत्येकी २० खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात टेबल टेनिस या क्रीडा प्रकाराची चाचणी घेण्यात येणार आहे. नवी मुंबई स्पोर्ट्स ॲण्ड सामाजिक विकास मंडळ, नवीन पनवेल येथे ही चाचणी घण्यात येणार आहे.

मिशन लक्षवेध या उपक्रम अंतर्गत खेळ व खेळाडू, क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा स्पर्धेचे आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळाडूंना करियर मार्गदर्शन खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी-विदेशी संस्थांचा सहभाग हे सर्व घटक विकसित करण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने मुंबई विभाग स्तरावर लॉन टेनिस, टेबल टेनिस, शूटिंग व वेटलिफ्टिंग ही क्रीडा निपुणता केंद्र सुरू करण्यात येणर असून गुणवंत खेळाडूंना उच्चस्तरीय प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्यात वेटलिफ्टिंग, मुंबई उपनगरमध्ये लॉन टेनिस,

क्रीडा निपुणता केंद्र सुरू केली जाणार

मुंबई शहरमध्ये शूटींग, तर रायगड जिल्ह्यात टेबल टेनिस या खेळांची चाचणी घेण्यात येणार आहे. नवीन पनवेल येथे ९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता ही टेबल टेनिस चाचणी घेण्यात येणार आहे. या चाचणीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नीलकंठ आखाडे (९९६७२७७०८२) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

यासाठी अर्ज करणाऱ्या खेळाडूचे वय २५ वर्षांपेक्षा कमी असावे. राज्यस्तर पदकप्राप्त व राष्ट्रीयस्तर स्पर्धा सहभाग घेतलेला असावा. जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत दोन वर्षातील क्रीडाविषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, शाळा-महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र आदी ऑनलाईन अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. अर्ज ऑनलाईन तसेच गुगल फॉर्म दोन्ही स्वरूपात भरावा. निवड चाचणीच्या दिवशी सदर मूळ कागदपत्रे व सत्यप्रती तसेच तीन आयकार्ड साईझ फोटो सोबत घेऊन उपस्थित रहावे. ई-मेल आयडी missionlakshvedhamumdivgmail.com आणि गुगल लिंक https://forms.gle/2f7yPkikdUBKNf7fA ही आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च आहे.

पनवेलच्या विचुंबेत राज्य अजिंक्यपदासाठी 'शक्तिप्रदर्शन'

आमदार चषक महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचा थरार रंगला

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष आणि एम.बी. फिटनेस जिम-विचुंबे तसेच बॉडी बिल्डर्स ॲण्ड फिटनेस असोसिएशन रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार चषक महाराष्ट्र श्री राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेला खेळाडू आणि शरीरसौष्ठवप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

विचुंबे येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर मैदान, ग्रामपंचायत कार्यालयासमोर येथे आयोजित या स्पर्धेला प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. त्याचप्रमाणे महापौर नितीन पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच भरत पाटील, नगरसेवक अजय बहिरा, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी सरपंच बळीराम पाटील, माजी उपसरपंच रवींद्र भोईर तसेच अनिल भोईर, विवेक भोईर, चेतन सुरते, अनंता गायकवाड, बॉडी बिल्डिंग जनरल सेक्रेटरी डॉ. संजय मोरे, दिनेश शेळके, महेश भिंगारकर यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत राज्यभरातील अनेक शरीरसौष्ठवपटूंनी सहभाग घेत आपल्या शरीरयष्टीचे आकर्षक सादरीकरण केले. उपस्थित प्रेक्षकांनी खेळाडूंना टाळ्यांच्या गजरात प्रोत्साहन दिले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आज येथे जमलेली गर्दी सांगते की, बॉडी बिल्डिंग हे क्षेत्र आता केवळ मर्यादित लोकांपुरते राहिलेले नाही. या खेळाची क्रेझ आता सर्व समाजात वाढत आहे. तरुणांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहून शरीरसौष्ठव आणि फिटनेसकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. अशा स्पर्धांमुळे युवकांना योग्य दिशा मिळते.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी विशेष मेहनत घेतली होती. सरतेशेवटी खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

आरसीबी हक्काच्या होम ग्राऊंडवरच खेळणार

बंगळुरू : वृत्तसंस्था

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६च्या उद्घाटन सामना हा ठरल्याप्रमाणे बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवण्यात येणार हे निश्चित झाले आहे. बीसीसीआयने पहिल्या २० सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले असून या वेळापत्रकानुसार २८ मार्च रोजी ठरल्याप्रमाणे गत चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सलामीची लढत रंगणार आहे.

उद्घाटनाचा सामना बंगळुरूच्या मैदानात होणार की नाही या संदर्भात संभ्रम होता, पण आता कर्नाटक सरकारकडून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) यांना आयपीएल सामन्याच्या आयोजनासाठी अंतिम मंजुरी मिळाली आहे.

आयपीएलच्या गत हंगामात

आयपीएल सामने आयोजनासाठी केएससीएला मंजुरी

आरसीबीच्या विजयानंतर विजय मिरवणुकीदरम्यान चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली होती, ज्यात ११ लोकांनी आपला जीव गमावला होता. त्यानंतर स्टेडियमच्या सुरक्षाव्यवस्था आणि पायाभूत सुविधांवर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत न्यायमूर्ती डी'कुन्हा समितीने सुरक्षेसंदर्भात अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. केएससीएला १५ मार्चपर्यंत सर्व आवश्यक सुधारणा पूर्ण करण्यासाठी वेळ देण्यात आला होता आणि त्यांनी ते काम पूर्ण केले आहे. त्यामुळे आता केएससीएला सामना आयोजित करण्याची परवानगी मिळाली आहे.

आरसीबीचा संघ एम. चिन्नास्वामी स्टेडियम उद्घाटन सामन्यासोबतच ५ एप्रिल रोजी चेन्नईविरुद्धचा सामनाही या मैदानात खेळताना पाहायला मिळणार आहे. यंदाच्या हंगामात आरसीबीचा संघ आपल्या घरच्या मैदानातील पाच सामने बंगळुरूच्या मैदानात, तर दोन सामने रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह स्टेडियममध्ये खेळणार आहे.

रजत पाटीदारच कर्णधार

आयपीएल २०२५च्या हंगामात पंजाब किंग्सचा पराभूत करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने पहिल्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली होती. यावेळीही आरसीबीला पहिली ट्रॉफी जिंकून देणारा रजत पाटीदारच संघाचे नेतृत्व करेल. याशिवाय विराट कोहलीची धमाकेदार फलंदाजी पाहण्यासाठीही चाहते आतूर आहेत.

मैत्रीण श्वेताशी यश दयाल विवाहबद्ध

कानपूर : वृत्तसंस्था

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळणारा युवा गोलंदाज यश दयाल विवाहबंधनात अडकला आहे. यशने त्याची मैत्रीण आणि प्रसिद्ध सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर श्वेता पुंडीर हिच्याशी लग्नाची नवी इनिंग सुरू केली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे यश दयालवर दोन महिलांनी बलात्काराचे आरोप केलेले आहेत. त्यापैकी एक अल्पवयीन मुलगी असून सध्या दयाल हा जामिनावर बाहेर आहे.

यश आणि श्वेता यांचा विवाह सोहळा उत्तर प्रदेशातील कानपूर येथे थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला यशचे जवळचे नातेवाईक, मित्र परिवार आणि क्रिकेट विश्वातील काही मोजके खेळाडू उपस्थित होते. सोशल मीडियावर या जोडप्याच्या लग्नाचे फोटो सध्या व्हायरल होत आहेत.

यश दयालची पत्नी श्वेता पुंडीर ही एक लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि कंटेंट क्रिएटर आहे. तिचे इन्स्टाग्रामवर मोठे फॅन फॉलोइंग असून ती तिच्या हटके व्हिडीओजसाठी ओळखली जाते. गेल्या काही काळापासून हे दोघे एकमेकांना डेट करत होते आणि आता त्यांनी आपल्या नात्याला लग्नाचे स्वरूप दिले आहे.

सुनील गावसकर काव्या मारनवर संतापले

मुंबई : प्रतिनिधी

आयपीएल २०२६च्या रणधुमाळीपूर्वी सनरायझर्स हैदराबादच्या मालकीण काव्या मारन सध्या क्रिकेट विश्वाच्या निशाण्यावर आहेत. इंग्लंडमधील 'द हंड्रेड' लीगसाठी मारन यांच्या मालकीच्या संघाने पाकिस्तानी फिरकीपटू अबरार अहमदला संघात स्थान दिल्याने नवा वाद उफाळून आला आहे. या निर्णयावर भारताचे माजी दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत.

'मिड-डे' मधील आपल्या स्तंभात सुनील गावसकर यांनी लिहिले की, नोव्हेंबर २००८च्या मुंबई हल्ल्यानंतर भारतीय फ्रँचायझी मालकांनी पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएलमध्ये पूर्णपणे डावलले आहे. पाकिस्तानी खेळाडूंना जे मानधन दिले जाते, त्यातून ते खेळाडू आपल्या सरकारला आयकर देतात. याच पैशातून शस्त्रे आणि दारूगोळा खरेदी केला जातो, जो शेवटी भारतीय सैनिक आणि निष्पाप नागरिकांच्या जीवावर उठतो.

डीआरएसवरून पाकिस्तान संघाची सामनाधिकाऱ्यांकडे तक्रार

ढाका : वृत्तसंस्था

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात खेळल्या गेलेल्या वनडे मालिकेतील तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात जोरदार ड्रामा पहायला मिळाला. शेवटच्या षटकापर्यंत रंगतदार झालेला या सामन्यातील पराभवानंतर पाकिस्तानची रडारड चर्चेत आली आहे. डीआरएसच्या मुद्द्यावरून पाकिस्तानच्या संघाने थेट सामनाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

ढाका येथील शेर बांगला नॅशनल स्टेडियमवर झालेली निर्णायक लढत बांगलादेशने जिंकत तीन सामन्यांची मालिका २-१ अशी खिशात घातली. शेवटच्या दोन चेंडूंवर पाकिस्तानला विजयासाठी १२ धावांची गरज होती. रिशाद हुसेनने पाचवा चेंडू शाहीन आफ्रिदीकडे लेग साइडला टाकला, जो पिचवर पडून बाहेर गेला. अंपायरने तो तत्काळ वाइड दिला, मात्र काही वेळानंतर

बांगलादेशच्या संघाने एलबीडब्ल्यूसाठी रिव्ह्यू घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाकिस्तानचा कर्णधार शाहीन आफ्रिदी नाराज झाला.

नियमांनुसार मोठ्या स्क्रीनवर रिप्ले दाखवण्यापूर्वीच कोणत्याही संघाला रिव्ह्यू घेण्याची परवानगी असते. बांगलादेशने ज्या चेंडूवर रिव्ह्यू घेतला तो आधीच वाइड देण्यात आला होता, त्यामुळे या चेंडूवर रिव्ह्यू घेण्याची शक्यता कमी होती. पाकिस्तान संघाचे म्हणणे आहे की, बांगलादेशने या नियमांचे पालन केले नाही. स्टेडियमच्या मोठ्या स्क्रीनवर त्या चेंडूचा रिप्ले दाखवण्यात आला होता आणि तो पाहिल्यानंतर बांगलादेशला चेंडूचा संपर्क झाल्याचा अंदाज आला. त्यानंतर त्यांनी रिव्ह्यू घेण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तान यावरही नाराज आहे की, बांगलादेशला कदाचित ठरलेल्या १५ सेकंदांच्या वेळेनंतर रिव्ह्यू करण्याची परवानगी देण्यात आली.

ईएसपीएन क्रिकइन्फोच्या वृत्तानुसार पाकिस्तानच्या संघाने या प्रकरणात सामनाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. मैदानातील पंच कुमार धर्मसेना यांनी बांगलादेशला एलबीडब्ल्यूसाठी रिव्ह्यू घेण्याची परवानगी का दिली? असा सवालही पाकिस्तान संघाने उपस्थित केला आहे. पाकिस्तान व्यवस्थापनाचे म्हणणे आहे की, मोठ्या स्क्रीनवर रिप्ले दाखवल्यानंतरच बांगलादेशने रिव्ह्यू घेतला. त्या रिप्लेच्या आधारे थर्ड अंपायरने शाहीन आफ्रिदीला बाद दिले आणि ऑन-फिल्ड अंपायरला आपला निर्णय बदलावा लागला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com